जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## पुन्हा एक नववर्ष – आशेचा उत्कर्ष ––

रोज दिवस उगवतो, मावळतो. महिना येतो जातो. म्हणता म्हणता वर्षही येते. हळूहळू सरते. वर्ष २०२४ जातोय. २०२५ येतोय. आपण मनुष्यप्राणी भयंकर आशावादी आहोत. किंबहुना येणारा प्रत्येक दिवस व भविष्य आशेवरच जगतो आपण.

या सर्वाची चर्चा करण्याचे कारण पुन्हा आलंय नववर्ष. नव्या उमेदीने व नव्या आशेने, नवउत्साहाने जगण्याचं निमित्त आलंय. वर्षाचं साधारण नियोजन, प्रयोजन (निदान स्वप्नात, मनात) प्रत्येक जण करत असतो. बहुसंख्य संकल्प करणारे आरंभशूर ठरतात. जानेवारी संपता संपताच ही स्वप्ने, निर्णय, संकल्प बारगळतात. म्हणूनच आता वाटते केवळ भव्य, दिव्य, आदर्श विचार, संकल्प न ठेवता आपणास सहजशक्य व रोजच्या राहणीमानात आवाक्यात असतील अशीच स्वप्ने पाहू या.

साध्या साध्या गोष्टीत आनंद पाहू या. जरी सर्वत्र स्वार्थ, भ्रष्टाचार व अस्वच्छता वाढली तरी मी सकारात्मक विचाराने राहायचा प्रयत्न करेन. केवळ टीकाटिपणी करण्यापेक्षा चुकीच्या गोष्टींना विरोध करू या. विशेषतः आपल्या शहराचे विकसित होणारे रस्ते, काही ठिकाणी दिसणारी अस्वच्छता, अंधःकार दूर होण्यासाठी स्थानिक, भावी नगरसेवक, प्रशासनाला सांगू या. आपल्या शहरातील वाहतूक कोंडी, बेशिस्त पार्किंग, सामाजिक जबाबदारी यातील आपलाही कर्तव्यवजा सहभाग वाढवू या.






नूतन वर्ष आपणास, आपल्या कुटुंब, स्नेहीजनास, शासन, प्रशासनास प्रामाणिक कार्य कर्तृत्व व आनंददायी जावो. **किशोर गांधी**, मुसाफिर, ९८२२०२०६९१

# मुख्यमंत्री साहेब, या 'आका' पासून आमचं अहिल्यानगर शहर वाचवा हो

### ताबेमारीविरुद्ध निवेदने देवून स्टंटबाजी; आका स्वतःला अहिल्यानगरचा बाप समजू लागला आहे काय? मुख्यमंत्री फडणवीसांना किरण काळेंचे जाहीर खुले पत्र

नगर – बीड येथील संतोष देशमुख हत्याकांडानंतर आ.सुरेश धस यांनी 'आका'वर आरोपांच्या फैरी झाडल्या. त्यानंतर आता अहिल्यानगर शहरामध्ये देखील एक 'आका' असून या आकावर कारवाई करण्याची मागणी करणारे जाहीर खुले पत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शहर काँग्रेस जिल्हाध्यक्ष किरण काळे यांनी लिहिले आहे.



काळे यांनी पत्रात म्हटले आहे की, मुख्यमंत्री महोदय, कधी काळी अहिल्यानगर शहराची तुलना कैरो, बगदादशी व्हायची. मात्र राजकारणाच गुन्हेगारीकरण, बाजारपेठ, व्यापाऱ्यांना उद्ध्वस्त करणारे षडयंत्र, प्रत्येक घटकाला वेठीस धरण्याचे किळसवाणे प्रकार, स्वकष्टाच्या जमिनी, प्लॉटवर होणारी ताबेमारी, ताबेमारी करणाऱ्या राजकीय 'आका' च्या ताबा गँग, 'जे गँग', मनपासारख्या शहराच्या लाईफलाईन आडून सुरू असणारी लूट, अवघ्या १२०९ रुपयांत पे अँड पार्किंगच्या नावाखाली सबंध शहराचा होणारा लिलाव यामुळे अहिल्यानगरकर अस्वस्थ आहेत. नगरकरांना अस्वस्थ करणारा 'आका' आता ताबेमारीच्या विरोधात खोट्या–नाट्या वल्गना करू लागला आहे. 'मी नाही त्यातली कडी लावा आतली' या उक्तीप्रमाणे वागू लागला आहे.

मुख्यमंत्री साहेब, आमच्या अहिल्यानगरला दृष्ट लागावी असा एक 'आका' 'आ वासून' आक्राळ विक्राळ रूप आता धारण करू पाहत आहे. दहशत, गुंडगिरी, दबाव तंत्र, प्रचंड पैशांचा वापर यातून एक–दोन नव्हे तर तब्बल तीन वेळा सार्वत्रिक निवडणुका 'आका'ने जिंकल्या खऱ्या, पण आजही हजारोंचा वर्ग या 'आका' पासून शहराला मुक्तता मिळावी म्हणून प्रतीक्षेत आहे. गैरमार्गाने मिळवलेल्या सत्तेमुळे 'आका' आता मस्तवाल होऊ पाहत आहे. अहो मुख्यमंत्री साहेब, या 'आका' पासून आमचं अहिल्यानगर शहर वाचवा हो, अशी आर्त हाक हतबल नगरकर भीतीपोटी जाहीर जरी बोलू शकत नसला तरी दबक्या आवाजात देत आहे.

नुकत्याच निवडणुका पार पडल्या. त्यानंतर मात्र या 'आका'ने अनेकांना वेठीस धरने सुरू केले. ताबा मारणाऱ्यांच्या यादीमध्ये कायम या 'आका'च्याच पंटर लोकांचीच नावे कशी काय येतात? एखादा पीडित पोलीस स्टेशनला गेला की तो पोहोचण्यापूर्वीच या 'आका'चा फोन कसा काय गेलेला असतो? ज्या 'आका'ची जे गँग एसपी ऑफिसवर हल्ला करू शकते, त्या पोलीस स्टेशनला आपल्याला काय न्याय मिळणार? या विचाराने अहिल्यानगरवासीयांनी हतबल का होऊ नये? आम्हाला पोलीस प्रशासनाला दोष द्यायचा नाही. पण सत्तेचा गैरवापर करून जर 'आका' पोलीस दलाचे खच्चीकरण करत असेल तर पोलिसांची इच्छा असूनदेखील ते पीडितांना न्याय कसा काय देऊ शकतील? ताबासम्राटच आता स्वयंघोषित कार्यसम्राट म्हणून पोलिसांना ताबेमारीच्या विरुद्ध निवेदने देण्याची स्टंटबाजी करून, सर्वसामान्य अहिल्यानगरवासियांचा जणू काही मी त्या गावचाच नाही, असे भासवत बुद्धीभेद करण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहे. पण अहिल्यानगरवासीय दूधखुळे नाहीत, हे 'आका'ने लक्षात घ्यावे.

मागील काही वर्षांमध्ये विविध भागांमध्ये हृदयद्रावक हत्याकांडं झाली. यामध्ये या 'आका'शी निगडितच लोकांचाच संबंध कसा काय असतो? 'आका'ने या शहरात अनेकांचा संतोष देशमुख केला तरी त्याचा बाल बाका का नाही होत? तीन महिने तुरुंगवारी करून आलेला 'आका' उजळ माथ्याने फिरतोच कसा? एका आयुर्वेदाचार्यांच्या नावाने असलेली नामांकित संस्था की ज्याची भूमी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पदस्पर्शाने पावन झाली आहे, त्यावर देखील पद्धतशीरपणे कसा काय ताबा मारला जातो? न्याय मागायला जाणाऱ्या पिडीतावरच 'आका' आणि त्याची गँग कसा काय अत्याचार करते?

आमच्या जैन समाजाच्या ऋषीतुल्य, गुरुतुल्य महानुभवांच्या विश्रांतीचे पवित्र ठिकाण असणाऱ्या जागेवर ताबा मारत आपले राजकिय कार्यालय थाटण्याची या 'आका'ची हिंमत कशी काय होते? बुरुडगाव रोडवरील ज्या चौकात एका जैन बांधवाला मारहाण करून 'आका'ने हिंसा केली, त्याच अहिंसा चौकात या 'आका'ची छाती काढून उभे राहण्याची हिंमत कशी होते? तत्कालीन एसपी विश्वास नांगरे पाटील यांनी 'आका'चा केलेला पोलिसी पाहुणचार 'आका' कसा काय विसरतो? व्यापार, उद्योग यामुळे दगडाखाली हात असणाऱ्या आमच्या बांधवांच्या हतबलतेचा 'आका' पुरेपूर गैरफायदा घेत नाही काय? असे अनेक प्रश्न काळे यांनी पत्रात उपस्थित केले आहेत.

पत्रात पुढे म्हटले आहे की, निवडणूक संपली आणि 'आका'ने भगवी टोपी, भगवा पंचा घालत स्वतःला 'हिंदू जनसेवक' अशी बिरुदावली लावून घेतली. शेळीने वाघाचं कातडं पांघरून वाघ झाल्याचा आव आणावा एवढं तर बेगडी 'आका'चं हिंदुत्व आहे. हे म्हणजे 'लबाड लांडग ढोंग करतय हिंदुत्वाचं सोंग करतय' असं आहे. या आडून 'आका' मतांची पोळी भाजतोय. थोडं थांबा. योग्य वेळ आली की, या 'आका'च्या अंगावरची वाघाची बेगडी झूल नगरकर काढून उखडून फेकतील. तेव्हा त्या खाली लपलेल खरं ओंगळवाण रूप समोर येईल.

शहराची लोकसंख्या सुमारे ५ लाख एवढी. मालमत्तांची संख्या १ लाख ३१ हजार. नोंदणीकृत वाहनांची संख्या ३ लाख ५० हजार एवढी. असे असतानाही मात्र पे अँड पार्कच्या नावाखाली 'आका'ने मनपा प्रशासनाला हाताशी धरून शहरातील मोक्याचे ३५ रस्ते आणि मनपाचे काही भूखंड प्रतिदिन अवघ्या १,२०९ रुपयांना विकत घेत सबंध शहरच कवडीमोड किंमतीला विकत घेण्याची हिंमत कशी काय केली? कोट्यावधी रुपयांचा मलिदा या आकाला आपल्या टोळ्या पोसण्यासाठी लाटायचा आहे. तिसऱ्यांदा गैरमार्गाने निवडून आल्यामुळे हे 'आका' आता स्वतःला अहिल्यानगर शहराचा बाप समजू लागले आहेत काय?

हे शहर फकीरांची वस्ती आहे. अनेक दादा आले आणि गेले. 'समय बडा बलवान है' अशी म्हण आहे. पापाचा घडा भरून ओसंडून वाहू लागला की तो पालथा होतोच. योग्य वेळी या 'आका'चा देखील बिमोड अहिल्यानगरकर नक्कीच करतील. त्यासाठी मी, किरण काळे कटीबद्ध आहे. विधानसभा निवडणुकीतच 'आका'ला धूळ चारली असती. पण काँग्रेसला संधीच मिळाली नाही. म्हणून हा 'आका' वाचला. नाही तर याच्या जुलमी राजवटीतून अहिल्यानगरवासियांची याच वेळी कायमची मुक्तता झाली असती. २०२४ जरी निसटल असले तरी २०२९ कोणत्याही परिस्थितीत निसटू देणार नाही.

मुख्यमंत्री साहेब, राज्याची सत्ता तुमच्या हाती आहे. अहिल्यानगर हे तुम्ही मुख्यमंत्री असणाऱ्या महाराष्ट्राचाच भाग आहे. जमलं तर अनेकांचा संतोष देशमुख करणाऱ्या आणि तमाम नगरकरांना कायम दहशत, गुंडगिरीच्या धारदार टोकावर उभे करत वेठीस धरणाऱ्या आकाच्या मुसक्या आवळता आल्या तर नक्की आवळा. नाहीतर जनता जनार्दन सुज्ञ आहेच. तुमची अपूर्ण कामे अहिल्यानगरवासीय लोकशाही मार्गाने पूर्ण करतील, असा इशारा किरण काळे यांनी आपल्या पत्रात दिला आहे.

## उड्डाणपुलावर दोन वाहनांचा अपघात

नगर – बोल्हेगाव वरून केडगाव कडे जाणाऱ्या चार चाकी वाहनास पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या क्रुझर गाडीने जोरात धडक दिली. या धडकेत दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले ही घटना शहरातील उड्डाण पूलावर सक्कर चौकात घडलीं.

याबाबतची अधिक माहिती अशी की सचिन मच्छिंद्र कळमकर (वय–२५, रा.कळमकर नगर, बोल्हेगाव) हा त्याचा चुलत भाऊ दत्ता गोपाळा कळमकर (रा. कळमकर नगर, बोल्हेगाव) याच्यासह टोयोटा कंपनीची फॉरच्यूनर चार चाकी गाडी (क्र.एम एच १६ डी पी ९९९०) घेऊन बोल्हेगांव येथुन केडगाव येथे कामानिमित्त जात असताना सक्कर चौक येथे उड्डाणपुलावर पाठी मागुन येणाऱ्या कुझर गाडी (क्र. एम एच ४६ ए एक्स ६६००) चालकाने कळमकर यांच्या गाडीला पाठीमागुन डाव्या बाजुला धडक देवून अपघात केला. त्यावेळी कळमकर यांनी गाडी थांबवून त्या वाहन चालकास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव संतोष आत्माराम ठोंबरे (रा. डोंगर, शेवली ता. चिखली जि. बुलढाणा) असे असल्याचे सांगितले.

याप्रकरणी पोलिसांनी सचिन कळमकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संतोष ठोंबरे याच्याविरुद्ध अपघाताच्या गुन्ह्याची नोंद केली. पुढील तपास स फौ वसंत सोनवणे हे करीत आहेत.

## श्रीमती बसंतीबाई लोढा यांचे अल्प आजाराने निधन



नगर – येथील रहिवासी श्रीमती बसंतीबाई शांतीलाल लोढा (वय ८९, रा.अक्षता गार्डनमागे, टिळक रोड, अ.नगर) यांचे २९ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे. त्या सुमतीलाल लोढा यांच्या मातोश्री तर त्रिमूर्ती ट्रेडींग कंपनीचे सागर लोढा यांच्या आजी होत.

## श्रीमती मालनबाई धेंड यांचे वृद्धापकाळाने निधन




नगर – येथील रहिवासी श्रीमती मालनबाई बाळकृष्ण धेंड (वय ८०, रा.गंजबाजार) यांचे २८ डिसेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांचे विखे पाटील हॉस्पिटल येथे देहदान करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## मुरलीधर कोकाटे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – येथील रहिवासी मुरलीधर किसन कोकाटे (सावकार, वय ७०, रा.चिचोंडी पाटील) यांचे ३० डिसेंबर रोजी पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ पत्नी, ३ भाऊ, ३ मुले, सुना, २ मुली, जावई असा परिवार आहे. ते राजेंद्र, किरण, संदीप कोकाटे यांचे वडील होत.

## सुशीला देशपांडे यांचे दुःखद निधन

नगर – येथील सुशीला कृष्णा देशपांडे (वय ८७) यांचे २८ डिसेंबर रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या मागे पती, चार मुले, सुना, नातवंडे, पतवंडे, मुलगी, जावई, नात, सून, नात, जावई असा परिवार आहे.



अहिल्यानगर शहरातील बांधकाम व्यावसायिक मकरंद व आंबीलवाडी येथील माजी सरपंच व विद्यमान सोसायटी चेअरमन दादासाहेब देशपांडे यांच्या त्या मातोश्री होत.

## सेवानिवृत्त हेड कॉन्स्टेबल शेषराव पाठक यांचे निधन

नगर – केडगांव मोहिनीनगर येथील रहिवासी सेवानिवृत्त पोलीस हेडकॉन्स्टेबल शेषराव बाबुराव पाठक (वय ८७) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. केडगांव येथील स्मशानभूमीमध्ये त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे, परतवंडे असा परिवार आहे.



एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक दीपक पाठक, शेवगांव पोलीस स्टेशन वाचक शाखेतील प्रकाश पाठक तसेच अहमदनगर जिल्हा न्यायालयातील वरिष्ठ लिपिक भरत पाठक यांचे ते वडील होत.

## दत्तात्रय बोरगे यांचे अल्पशा आजाराने निधन

श्रीगोंदा – श्रीगोंदे तालुक्यातील ढवळगाव येथील माजी उपसरपंच दत्तात्रय नाना बोरगे (वय ६७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.



त्यांच्या पश्चात पत्नी चार मुले सुना नातवंडे भाऊ पुतणे असा मोठा परिवार आहे. माजी सरपंच तुकाराम बोरगे यांचे लहान बंधू, राहुल बोरगे यांचे वडिल तसेच विद्यमान उपसरपंच मनिषा राहुल बोरगे यांचे सासरे होते. गावात 'अण्णा' नावाने प्रचलित होते.



व्यापाऱ्यांच्या जमिनीवर विशिष्ट समाजाकडून ताबेमारी होत असल्याच्या निषेधार्थ आ. संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अधीक्षक राकेश ओला यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे कारवाईची मागणी करण्यात आली. (छाया – लहू दळवी)

# व्यापाऱ्यांच्या मालकीच्या जमिनीवर विशिष्ट समाजाकडून 'ताबेमारी'

### शिष्टमंडळासमवेत आ.संग्राम जगताप यांनी जिल्हा पोलीस प्रमुखांची भेट घेत कारवाईची केली मागणी

नगर – नगर तालुक्यातील वाटेफळ येथील अनिल व विजय वालचंद गांधी, बाबुर्डी येथील सुदर्शन डुंगुरवाल आणि वाकोडी येथील धनेश कोठारी यांच्या जमिनीवर विशिष्ट समाजाकडून ताबेमारी करीत राजरोजपणे पाल टाकण्याचे काम केले जाते. त्याच्या निषेधार्थ शहरातील सर्व व्यापारी संघटित होऊन आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अधीक्षक राकेश ओला यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे कारवाईची मागणी केली.

यावेळी जयेश पोखरणा, पिंटू कटारिया, कमलेश भंडारी, दिनेश संकलेचा, रोहन बोरा, संदीप बोरा, गणेश बुरा, नितीन शिंगवी, रितेश सोनीमडलेचा, सचिन छाजेड, मनीष लोढा, ईश्वर बोरा, दिनेश संकलेचा, भरत गुरुनानी, पराग मानधना आदी उपस्थित होते.

शहरातील व्यापाऱ्यांच्या जमिनीवर नगर तालुक्यातील गावांमध्ये विशिष्ट सम ाजाकडून पाल टाकून ताबेमारी केली जाते तसेच खंडणी मागत दमबाजी केली जाते अशा लोकांचा बंदोबस्त करावा यासाठी पोलीस अधीक्षकांची भेट घेतली असून यावेळी कारवाईची मागणी केली. अशा प्रवृत्तीच्या विरोधात महाराष्ट्र सरकारकडे कायदा करण्याची मागणी केली जाईल तसेच सर्वसामान्य लोकांना न्याय–हक्क मिळाला पाहिजे यासाठी काम केले जाईल असे आश्वासन आमदार संग्राम जगताप यांनी दिले. यावेळी पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी संबंधित व्यक्तींवर कारवाई केली जाईल असे आश्वासन व्यापारी वर्गाला दिले.

## चारा पाण्याविना जनावरांची वाहतूक करणारा टेम्पो पकडला

नगर – क्रुरतेने व निर्दयीपणे वागणुक देऊन चारा, पाण्याविना टेम्पोतून वाहतुक केल्या जात असलेल्या १२ जनावरांची नागरिकांनी पोलिसांच्या मदतीने सुटका केली. जनावरे व टेम्पो असा सात लाख २० हजार रूपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे. कल्याण रस्त्यावरील नेप्ती (ता. नगर) शिवारात सागर भेळ सेंटर जवळ ही कारवाई करण्यात आली.

याप्रकरणी श्रेयश मिलिंद नराल (वय २१, रा. पाईपलाईन रस्ता, वाणीनगर, सावेडी) यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून नवमान अब्दुल समद कुरेशी (रा. मोशी बाजार, चाकण, ता. जुन्नर, जि. पुणे), इम्रान हुसेन कुरेशी (रा. पनसुंबापेठ, ता. जुन्नर, ता. पुणे), साबीर कुरेशी (रा. चांदा, ता. नेवासा) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका टेम्पोतून जनावरांची वाहतुक केली जात असल्याची माहिती श्रेयश नराल यांना मिळाली होती. त्यांनी साथीदारांच्या मदतीने नेप्ती शिवारात संशयित टेम्पो (एमएच ०४, ईवाय ९२०१) पकडला. याची माहिती नगर तालुका पोलिसांना देण्यात आली. पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पंचासमक्ष टेम्पोची पाहणी केली असता १२ जनावरांची दाटीवाटीने क्रुरतेने व निर्दयीपणे चारा, पाण्याविना वाहतुक केली जात असल्याचे समोर आले. पोलिसांनी जनावरे व टेम्पो ताब्यात घेतला. अधिक तपास पोलीस अंमलदार झावरे करत आहेत.



महापालिका राबविणार फ्लेक्समुक्त अहिल्यानगर अभियान राबविण्यासंदर्भात बैठकीत सूचना देताना आयुक्त यशवंत डांगे. समवेत अधिकारी.

# बंगाल चौक परिसरात सार्वजनिक ठिकाणी जनावरे बांधणाऱ्या व्यक्तीवर गुन्हा दाखल

### वारंवार सूचना देऊनही दुर्लक्ष करणाऱ्या जनावरांच्या मालकांना महापालिकेचा दणका

नगर – बंगाल चौकी परिसरात बस स्टॉपच्या शेडमध्ये, रस्त्यावर सार्वजानिक ठिकाणी सातत्याने जनावरे बांधणाऱ्या, महानगरपालिकेच्या दंडात्मक कारवाईला न जुमानता वारंवार रस्त्यावर सार्वजानिक ठिकाणी जनावरे बांधणाऱ्या जनावराच्या मालकावर महानगरपालिकेने अखेर गुन्हा दाखल केला आहे. बंटी श्रीनिवास वायकर (रा. बंगाल चौक) असे त्याचे नाव आहे. रस्त्यावर, सार्वजनिक ठिकाणे जनावरे बांधणाऱ्या जनावराच्या मालकावर यापुढे अशाच प्रकारे गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिला आहे.

बंगाल चौकी परिसरात बस स्टॉपवर व रस्त्यावर सातत्याने जनावरे बांधली जातात. या ठिकाणी जनावरांना नुकसान पोहोचवणाऱ्या घटनाही वारंवार घडलेले आहेत. महानगरपालिकेने सदर जनावराच्या मालकावर यापूर्वीही कारवाई केलेली आहे. मात्र महानगरपालिकेच्या दंडात्मक कारवाईला न जुमानता वारंवार रस्त्यावर जनावरे बांधली जात असल्याने अखेर महानगरपालिका प्रशासनाने कठोर पावले उचलत सदर जनावराच्या मालकावर कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.जनावराच्या मालकांनी आपली जनावरे आपल्या स्वतःच्या जागेत सुरक्षित ठिकाणी बांधावीत. रस्त्यावर वाहतुकीला अडथळा निर्माण होईल, इतर नागरिकांना त्रास होईल, उपद्रव निर्माण होईल अशा पद्धतीने रस्त्यावर जनावर बांधू नयेत अन्यथा महानगरपालिकेच्या कोंडवाडा विभागामार्फत दंडात्मक कारवाई केली जाईल. वारंवार सूचना देऊनही त्याकडे दुर्लक्ष केल्यास जनावराच्या मालकांवर फौजदारी गुन्हे दाखल केले जातील, असे आयुक्त यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले आहे.



बंगाल चौक परिसरात सार्वजनिक ठिकाणी बांधलेली जनावरे.

सेल्फ अॅडेसिव्ह पी व्हि सी वॉल टाईल्स, सेल्फ अॅडेसिव्ह वॉलपेपर, किचन वॉलपेपर, रोमन ब्लॉईंडस्,रोलर ब्लॉईंडस्, झेब्रा ब्लॉईंडस्, व्हर्टिकल ब्लॉईंडस्, उडन ब्लॉईंडस्, कस्टमाईज ब्लॉईंडस्,चीक् ब्लॉईंडस्, तयार कर्टन्स, कर्टन क्लॉथ,कर्टन रॉड व फिटींग, मच्छर जाळी, आटि.वॉल ग्रास, धुळी पासुन संरक्षणासाठी प्लास्टीक तयार पडदे
गुलाबचंद कारपेटवाला
खिस्तगल्ली, जुना कापड बाजार मागे, अहमदनगर.
मो. ९४२२३३९४६०,९४२२३३९४४२,९४२२४५४००५

# गृहिणी

## आरोग्य

### हिवाळ्यात करा सर्दीवर मात

हिवाळ्यात सर्दी, घसा खवखवणे आणि त्वचेच्या समस्या सामान्य आहेत. अशा परिस्थितीत आवळा पाण्याची वाफ घेणे हा एक प्रभावी आणि नैसर्गिक उपाय आहे. आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सी, अँटीऑक्सिडेंट आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात, जे बंद झालेले नाक उघडतात व सर्दीशी लढण्यास मदत करतात.

## पाककला

### बाजरीची इडली

**साहित्य :** बाजरीचे पीठ १ वाटी, अर्धा कप रवा, अर्धी वाटी तांदळाचे पीठ, अर्धी वाटी उडीद डाळ, १/४ आंबट दही, १ पॅकेट बेकिंग सोडा किंवा एनो, मीठ चवीनुसार, तुकडे केलेली हिरवी मिरची, १ टेबलस्पून मोहरी, ७ ते ८ पाने कढीपत्ता, तेल

**कृती :** सर्वात आधी एका भांड्यात बाजरीचे पीठ, दही, उडीद डाळ, तांदळाचे पीठ आणि मीठ एकत्र करून घ्या. आता त्यात पाणी घाला आणि गुळगुळीत पेस्ट तयार करा. हे पिठ अर्धा तास आंबायला ठेवा. आता त्यात इनो किंवा बेकिंग सोडा घालून पाणी घालून पुन्हा मिक्स करा. इडली स्टँड घ्या, त्यात तेल लावा, तयार मिश्रण घाला आणि वाफ करा. इडली शिजल्यावर ताटात काढून घ्या. आता एक कढईत तेल घालून हिरवी मिरची, मोहरी आणि कढीपत्ता घालून फोडणी बनवून घ्या. आता ही फोडणी तयार इडलीवर घालावी.

## सौंदर्य

### त्वचेवरील सुरकुत्या कमी करण्यासाठी

पालकामध्ये अ, क, ई आणि के जीवनसत्त्वे असतात, जे त्वचेला खोल पोषण देतात. या फेसपॅकमुळे त्वचा उजळते आणि चमक वाढते. पालकामध्ये अँटिऑक्सिडेंट असतात, जे त्वचेला फ्री रॅडिकल्सपासून वाचवतात. यामुळे सुरकुत्या कमी होतात आणि त्वचा तरुण दिसते.

## वास्तू

स्वयंपाकघरात वापरले जाणारे पोळपाट लाटणे हे शुभ मानले जाते. यामुळे किचन स्लॅबवर पोळ्या लाटणे चुकीचे आहे.

## सल्ला

पोळपाट लाटणे हे राहू-केतूशी संबंधीत मानले जाते. ते न वापरल्यास केल्यास दारिद्र्य येते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. ३१ डिसेंबर २०२४

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, पौष शुक्लपक्ष, पू.षा. २४।०४, सूर्योदय ०६ वा. ३५ मि. सूर्यास्त ०६ वा. ०२ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : आज जास्त खर्च होईल. इतरांना सहकार्य केल्याने सामंजस्य वाढेल.

**वृषभ** : एखादे नवे नाते आपल्यावर प्रभाव पाडेल. प्रवासाचे योग संभवतात. मागील उधारी वसुल होईल.

**मिथुन** : संस्था, संघटनेत महत्वाचे काम मिळू शकते. प्रवासाचे योग संभवतात. जुने मित्र भेटतील.

**कर्क** : वाहने व उपकरणे जपून चालवा. नवीन कार्यात, योजनांमध्ये यश मिळेल. घर जागा संबंधी व्यवहार यशस्वी होतील

**सिंह** : आरोग्याची व खाण्या-पिण्याची काळजी घ्या. मागील उधारी व उसनवारी वसूल होईल.

**कन्या** : प्रवासाचे योग संभवतात. कार्यात अडचणी येण्याची शक्यता आहे. व्यापार व्यवसाय चांगला राहिल.

**तूळ** : तब्येत बिघडेल. आज आपल्या करीयरशी संबंधित सर्व बाबी स्पष्ट होतील.

**वृश्चिक** : आर्थिक विषयांमध्ये नुकसान संभवते. पाकिट चोरीला जाईल. भाऊबंद डोके वर काढतील.

**धनु** : दिवस आनंदात जाईल मात्र मातृचिंता सतावेल. कुटुंबियांसमवेत सहलीला जाल.

**मकर** : अधिकारी वर्गाचे पाठबळ मिळेल. शत्रू पराभूत होतील. संभाषणात प्रभाव राहिल.

**कुंभ** : दिवस कालच्या इतका आनंदात जाणार नाही. कार्यालयीन कामकाजात त्रास होईल.

**मीन** : आरोग्य उत्तम राहील. अधिकारी वर्गाच्या हातात अडकलेली कामे पूर्ण होतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

रटाळ भाषणाला कंटाळलेले श्रोते एकामागून एक निघून चालले होते सभागृह रिकामे होत होते.
एक श्रोता मात्र प्रामाणिकपणे बसून होता, वक्ते म्हणाले,
''तुम्ही का बसून राहिला आहात?''
तो श्रोता म्हणाला ''तुमच्या नंतर मी बोलणार आहे.''

# जागतिक आश्चर्ये


## हॉवर्ड मेडीकल इन्स्टिट्यूट

हॉवर्ड मेडीकल इन्स्टिट्यूट संशोधकाचे पसंतीची शिक्षणसंस्था मानली जाते. कारण या इन्स्टिट्यूटमध्ये भेट देणाऱ्या संशोधकांसाठी शेकडो निवासस्थाने तर आहेतच शिवाय ३०० मिटर लांबीची प्रयोगशाळा उपलब्ध आहे.

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०८२

सौ.शैलजा कुलकर्णी



### शब्दगंध क्र. ७०८१ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) मंत्र्याच्या नावाअगोदर लावतात तो शब्द ४) कसाई; खाटिक ६) वेशीवरचा पहारेकरी ८) कहाणी; गोष्ट १०) ताप येण्यापूर्वीची स्थिती ११) घराच्या मागची मोकळी जागा १४) वितरण; वाटणी १५) जरब; दरारा; वचक १६) फळ वगैरेचा कापलेला भाग किंवा फोड १८) ज्याची शिकार करावयाची आहे तो प्राणी १९) डोके; मस्तक २१) पाणी साचलेला खड्डा २२) देश सोडून पळून गेलेला २३) शोध; ठावठिकाणा; पत्ता

**उभे शब्द :-** १) नाटक, चित्रपट यातील मुख्य नट २) जनावर ज्याला बांधले जाते ती दोरी ३) ताप चढण्यापूर्वी अंगावर येणारे शहारे ४) लाकडी दरवाजा उघडताना व बंद करताना होणारा आवाज ५) एक प्रवासी वाहन ७) सकस; सत्त्वयुक्त ९) चापटी; थप्पड १२) चापट; मऊ पदार्थाचा आघात १३) एक फूल; राजीव; नीरज; कमळ १४) बेताल; मर्यादेपेक्षा जास्त १५) पळून काढलेले अंतर १७) कापडी भिंत; पटल १८) अयोध्येचे मूळ नाव २०) आश्रय; आसरा

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : वेळ उधळू नका, तिची गुंतवणूक करा. फुकट दवडलेला वेळ गुंतवणूक नव्हे, त्यावर व्याज ही नाही आणि लाभांशही नाही.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### घड्याळाचा शोध लावल्यावर कसे कळले नेमकी वेळ काय झाली आहे?

अगदीच सोपे आहे बघा. कल्पना करा की तुम्ही तुमच्या देशापासून खूप लांब अशा निर्जन बेटावर अडकले आहात. तुमच्या जवळ घड्याळ तर आहे परंतु ते तुम्ही तुमच्या देशाच्या स्थानिक वेळेवर लावलेले आहे, अर्थात त्या बेटाच्या भौगोलिक स्थितीच्या दृष्टीने ते घड्याळ भलत्याच वेळा दाखवत असणार म्हणजे कदाचित तुमच्या घड्याळात १२ वाजलेले असतील व त्या बेटावर नुकताच सुर्योदय होत असेल. मग तुम्हाला तुमचे घड्याळ त्या बेटाच्या वेळे प्रमाणे लावावे लागेल. मग हे करायचे कसे?

अगदीच सोपे काम आहे. जेथे दिवसभर सुर्यप्रकाश पडत असेल असे मैदान शोधायचे. एक सरळसोट दोन-तीन फूट लांबीची काडी मैदानावर जमिनीशी काटकोन करेल अशा रितीने खोचायची (काडी जमिनीवर एक ते दीड फूट वर रहायला पाहिजे) त्या काडीची सावली पडेल, त्या सावलीच्या टोकावर कशानेही खूण करावी. अशा प्रकारे थोड्या थोड्या वेळाने सावली कुठपर्यंत पडते, ते पहात खूणा करत घ्यायच्या. एक वेळ अशी येईल की सावली लहानातील लहान असेल व नंतर परत तीची लांबी वाढत जाईल. ज्या वेळी सावलीची लांबी कमीत कमी असेल, ती वेळ म्हणजे त्या ठिकाणी दुपारचे १२ वाजलेले असतील. त्या प्रमाणे तुमचे घड्याळ लावून घ्या म्हणजे तुम्हाला स्थानिक वेळा अचूक समजतील.

याच तत्वावर प्राचीन काळची सुर्य घड्याळं निर्माण झाली. व ज्या कोणी पहिल्यांदा आजचे यांत्रिकी घड्याळ बनवले असेल त्याने सुद्धा स्थानिक वेळेनुसार आपल्या घड्याळात वेळ सेट केली असणार.

आज आपण भारतात, भारतीय प्रमाणवेळेनुसार व्यवहार करतो. ही प्रमाणवेळ रेखांश वर प्रमाणीत केलेली आहे. या रेखांशच्या पुर्वेस अथवा पश्चिमेस असलेल्यांसाठी स्थानिक वेळ व आय एस टी मध्ये फरक पडेल.

## हुशार ससा

एका घनदाट जंगलात एक मोठा सिंह राहत होता. तो रोज शिकारीला जायचा आणि एक नव्हे, दोन नव्हे, तर अनेक प्राण्यांचा जीव घेत असे. जंगलातील प्राण्यांना भीती वाटू लागली की सिंहाने अशीच शिकार केली तर असा दिवस येईल की जंगलात एकही प्राणी राहणार नाही.

संपूर्ण जंगलात गोंधळ उडाला. सिंहाला रोखण्यासाठी काही उपाय करणे आवश्यक होते. एके दिवशी जंगलातील सर्व प्राणी एकत्र आले आणि या प्रश्नावर विचार करू लागले. शेवटी त्यांनी ठरवले की, आपण सर्वांनी सिंहाकडे जावे आणि त्याच्याशी याबद्दल बोलले पाहिजे. दुसऱ्या दिवशी प्राण्यांचा एक गट सिंहाकडे पोहोचला. त्यांना आपल्या दिशेने येताना पाहून सिंह घाबरला आणि गर्जना करत विचारले, काय आहे? तुम्ही सगळे इथे का येताय?

प्राणी समूहाचा नेता म्हणाला, महाराज, आम्ही तुमच्याकडे विनंती करायला आलो आहोत. तू राजा आहेस आणि आम्ही तुझी प्रजा. जेव्हा तुम्ही शिकारीला जाता तेव्हा तुम्ही अनेक प्राणी मारता. ते सर्व तुम्ही खाऊ शकत नाही, आणि असे केल्यामुळे जंगलातील प्राण्यांची संख्या कमी होत आहे. हे असेच चालू राहिले तर काही दिवसांत तुमच्याशिवाय जंगलात कोणीही उरणार नाही. प्रजेशिवाय राजा कसा जगेल? जर आम्ही सर्व मरण पावलो तर आपणही राजा राहणार नाही. आपण कायम आमचा राजा राहावा अशी आमची इच्छा आहे. आम्ही तुम्हाला फक्त तुमच्या घरी थांबण्याची विनंती करतो. आम्ही दररोज एक प्राणी तुमच्यासाठी खाण्यासाठी पाठवू. अशा प्रकारे राजा आणि प्रजा दोघेही शांततेत राहू शकतील. सिंहाला वाटले की प्राण्यांच्या म्हणण्यात तथ्य आहे. त्याने क्षणभर विचार केला, मग म्हणालाही चांगली गोष्ट आहे. मला तुमची सूचना मान्य आहे. पण लक्षात ठेवा, जर तुम्ही मला खायला पुरेसे अन्न पाठवले नाही, तर मी हवे तितके प्राणी मारून टाकीन. प्राण्यांना दुसरा पर्याय नाही. त्यामुळे त्यांनी सिंहाची अट मान्य केली आणि आपापल्या घरी गेले.

त्या दिवसापासून सिंहाला खाण्यासाठी रोज एक प्राणी पाठवला जात असे. त्यासाठी जंगलात राहणाऱ्या सर्व प्राण्यांमधून एक-एक प्राणी निवडण्यात आला. काही दिवसांनी सशांचीही पाळी आली. सिंहाच्या अन्नासाठी एक लहान ससा निवडला गेला. तो ससा जितका लहान होता, तितकाच हुशार होता. सिंहाच्या हातून विनाकारण मरणे मूर्खपणाचे आहे असे त्याला वाटले. कोणाचा तरी जीव वाचवण्यासाठी कुठला ना कुठला मार्ग अवलंबला पाहिजे आणि शक्य असल्यास असा पर्याय शोधला पाहिजे ज्यामुळे प्रत्येकाची या समस्येतून कायमची सुटका होईल. शेवटी, त्याला एक मार्ग सापडला.

(क्रमश:)

# रहमते दर्शन (भाग - १)



## सच्चा अधिकारी

वही कृपाल का रूप, माथे, आँखों में और सारे मुखमंडल पर रोशनी का एक बड़ा चक्र चल रहा था। यह रोशनी बढ़ते-बढ़ते काफी तेज हो गई और कृपाल के स्वरूप में महाराज दर्शनसिंह जी ने कहा, हुण ते यकीन आया ई। पंजाबी लफ़्ज थे। फिर देखते-देखते उन्होंने संत दर्शनसिंह जी का स्वरूप धारण कर लिया। मैंने उनके चरणों में माथा टेका और दौड़ा-दौड़ा संगत के बीच आकर महाराज दर्शनसिंह जी का गुणगान करने लगा। जिन लोगों को शुरू में विश्वास नहीं आता था, उन्होंने थोड़ा विरोध भी किया परन्तु मैंने आँखिन देखी सब कुछ सच-सच बता दिया। अब मैं कैथल से दिल्ली आ गया और अब मेरा एक ही काम था, सबको इस घटना की जानकारी देना। मैंने अमेरिका में खन्ना साहब से लेकर सब तरफ कई चिट्ठियाँ लिखीं और सब कुछ बयान किया।

महाराज दर्शनसिंह जी की दया की एक कहानी सुनाकर मैं अपनी बात ख़त्म करना चाहूँगा। एक बार मेरी पत्नी की, जिसे टी. बी. की शिकायत थी, हालत दिनों-दिन ख़राब होती चली गयी। मैंने अनेक तरह से इलाज कराया, पर जब कोई आराम नहीं हुआ तो मैं उसे लेकर सीधा संत दर्शनसिंह जी महाराज के पास कृपाल आश्रम चला आया। उन दिनों वे शाम को संगत को दर्शन देते थे और फ़रियाद सुनकर सबकी मुश्किल हल करते थे। मैं भी उनके समक्ष पेश हुआ और दुःखभरी कहानी सुनाई और डॉक्टर का वह कागज़, जिस पर उसने दवाइयाँ लिखी थीं, हुज़ूर को दिखाने लगा। हुज़ूर उस कागज़ को देखकर देर तक पढ़ते रहे। सारी संगत हैरान थी कि महाराज जी इस कागज़ में क्या पढ़ रहे हैं? किसी को क्या मालूम कि अपनी कृपा दृष्टि से मेरी पत्नी के बुरे कर्मों का नाश कर रहे हैं। काफी देर बाद उन्होंने मुझे वह कागज़ थमा दिया और कहने लगे, घबराओ नहीं! हुज़ूर दया करेंगे। मैं अपनी पत्नी को लेकर चला आया। मेरे आश्चर्य का ठिकाना नहीं रहा कि दिनों-दिन मेरी पत्नी की हालत सुधरती गयी और कुछ ही दिनों में वह भली-चंगी हो गई।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

## दिमाग की शक्ती

ऐसी दशा में मन में उनके प्रति भरोसा रखें परंतु लेनदेन आवश्यकता से ज्यादा नहीं करना। ऐसे लोग किन्हीं कारणों से कर्ज तले दब जाते हैं में या कुछ और परेशानी से घिर जाते हैं, कंगाल बन जाते हैं। इस दशा उनके हर रोज के खाने पीने का प्रबंधन कर दे बाकी कर्ज उन्हें अपने आप उतारने दे। अगर आप जीवन साथ साथ बिता रहे हैं तो विश्वास करना पहला जरूरी कदम है। सम्बन्धों के मामले में समय लें, खासतौर पर जब आप किसी से प्यार करें। एक दम शादी के लिये तैयार न हो जाएं। समय एक मात्र चीज है जो आप को बताएगा कि क्या कोई आप के विश्वास का हकदार है या नहीं।

आप जिन छोटे बच्चों के साथ व्यवहार करते हैं, अगर उन पर विश्वास नहीं करते हैं तो परिणाम अच्छे नहीं होंगे। वे फल फूल नहीं सकेंगे। उनका विवेक कमजोर होगा। क्योंकि उन्हें विवेक विकसित करने का कभी मौका ही नहीं दिया। वह अपनी योग्यताओं पर यकीन नहीं करेंगें। बच्चों पर विश्वास करना पौधो को पानी देने जैसा है। विकास करने के लिये बच्चों को इसी की जरूरत है। निर्धारित समय पर बच्चों के स्कूल से न लौटने पर क्या उसे सजा देते हैं। उस पर यकीन नहीं करते हैं तो यह गलत है। देरी से आने पर उस द्वारा बताए गये करणों का टेलीफोन से वेरीफाइ करते हैं तो यह अविश्वास है। आप आपने बच्चों को एक सीमा तक ही सिखा सकते हैं। इस के बाद आप को विश्वास करना ही होगा। जब लोग सामूहिक रूप से किसी एक सकारात्मक उद्देश्य पर मनन करते हैं तो उनके आस पास के संसार में सकारात्मक चीजें होने लगती हैं। जहां ध्यान किया गया, वहां आस पास के समुदाय में अपराध और हिंसा में कमी आई। अगर हम दूसरों पर विश्वास करते हैं तो उस से भी वही परिणाम आते हैं जो साधना से आते हैं। जब आप दूसरे लोगों पर विश्वास करते हैं तो यह उन्हें बेहतरीन चीजो की ओर ले जाता है। फिर यह संक्रामक बन जाता है। अगर आप मुरली सुनाते हैं या कहीं प्रचारक हैं तो उन पर विश्वास भी करें कि वह सही दिशा में कार्य करेंगें। अगर आप दूसरों पर विश्वास करते हैं तो यह दूसरे लोगों के साथ सम्बन्धों को अच्छा बनाएगा। वह चाहे परिवार हो, मित्र हो या सहकर्मी हो। जब हम दूसरों पर विश्वास करते हैं तो एक चेन रिएक्शन शुरू हो जाती है जो आप से बाहर भी जाती है और लौट कर आप की ओर आती भी है। दिमाग और संसार में विश्वास

विश्वास के बिना जीना, कोहरे में कार चलाने जैसा है। विश्वास खुद बढ़ता जाता है। विश्वास स्वंय से शुरू होता है और आप के आस पास के लोगों तक फैलता है। फिर आप जिन लोगों के संपर्क में आते हैं, उन तक फैलता जाता है। यह एक नीव, एक आधार

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

## गर्भावस्थेतील आजार व उपचार

पहिल्या तीन महिन्यामध्ये गर्भ नाजूक असल्या कारणाने ॲण्टीबायोटिक्स, वेदनाशामके डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय घेऊ नये. काही गर्भवती स्त्रिया या आजारी पडल्यावर केमिस्टकडे जाऊन त्यांच्या सल्ल्याने औषधे घेतात आणि त्यामुळेही फरक पडला नाही, तर डॉक्टरांकडे जातात; परंतु ही अतिशय चुकीची पद्धत आहे. यामुळे गर्भाच्या आरोग्याला व जीवाला धोका पाहोचू शकतो. अगदी घरगुती उपचार करावयाचे असल्यास ज्या औषधांमुळे गर्भवती व गर्भावर परिणाम होणार नाहीत अशी सहज उपलब्ध होणारी घरगुती आयुर्वेदिक औषधे वापरून पाहावीत. ही औषधे फक्त साध्या त्रासांवर उपयोगी पडू शकतात. १) उलटी व मळमळ : गर्भवतीच्या शरीराला गर्भाची सवय नसते; त्यामुळे १ ते ३ महिने व मळमळ जास्त प्रमाणात होते. यालाच आमच्या वैद्यकीय भाषेत morning sickness असे म्हणतात. ही अवस्था त्रास पाळी चुकल्यानंतर १० ते १५ दिवसांमध्ये जाणवते गर्भवतीला उलटी व मळमळ जास्त प्रमाणात झाल्यानंतर १० ते १५ दिवसांमध्ये जाणवतो व तिसऱ्या महिन्यानंतर हळूहळू कमी होऊ लागतो; कारण तोपर्यंत गर्भवतीच्या शरीराला गर्भाची सवय होते. या त्रासाचे निश्चित कारण सांगता येत नाही; परंतु गर्भावस्थेत होणाऱ्या बदलामुळे Harmones हा त्रास होतो.

**उपाययोजना :** सकाळी उठल्यावर गर्भवतीने पातळ पदार्थ उदा. टाळावे. उठल्यावर सुरुवातीला कोरडेच पदार्थ खावेत. उदा. बिस्को किंवा प्लेटभर शिरा किंवा ड्रायफ्रूटस् असे खावे, कारण रात्रभर पोटात काही गेल्यामुळे पित्त साचलेले असते व सकाळी उठल्यावर पातळ पदार्थ घेण्यात रात्रभर साचलेले पित्त व घेतलेला पातळ पदार्थ उलटीतून बाहेर पडते; म्हणून द्रवपदार्थ घेण्याचे टाळावे. त्याऐवजी कोरडे पदार्थ खावेत. कोरडे पदार्थ रात्रभर साचलेले पित्त तो पदार्थ पचविण्याचे काम करते व त्यामुळे उलटी होत ना एकदम पोटभर जेवण्यापेक्षा थोड्याथोड्या अंतराने खात राहावे व खाल्ल्यानंतर अर्धा तास तरी झोपून राहावे. यामुळे उलटी होण्याची संभावना कमी होते.

**आयुर्वेदिक औषधी उपाययोजना :** लवंग, वेलदोडा, आवळा सुपारी. आवळा कॅण्डी जेष्ठमधाचा तुकडा, खडीसाखर या पदार्थांनी तोंडातील कडूपणा कमी होतो. मक्याचा लाह्या, मुरमुरे, फुटाणे या हलक्याशा पदार्थांनी देखील गर्भवतीची मळमळ कमी होते गुलकंद आणि लोणी यांचे एकत्र समान विभाग करून २-२ चमचे सकाळ-दुपार-संध्याकाळ चाटण करावे. यामुळे उलटीची भावना कमी होते व गर्भवतींना बल मिळते. त्याचबरोबर डाळिंबाचा रस प्यावा किंवा डाळिंब खावे. एवढे प्रयत्न करूनही जर त्रास होत असेल तर डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधोपचार करावेत.

**छातीत व पोटात जळजळणे :** हा त्रास साधारणत: झोपलेल्या अवस्थेत जास्त जाणवतो. तसेच शेवटच्या महिन्यांमध्ये जाणवतो, कारण गर्भाशयाची उंची वाढल्याने त्याचा दाब आमाशय (Stomach) वर पडतो;

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



'इलिस्टा बेस्ट सिंगर अवॉर्ड', फिल्मफेअर अवॉर्ड सारखा हा सोहळा रंगला...

# नगरमध्ये रंगला 'इलिस्टा बेस्ट सिंगर अवॉर्ड' सोहळा

नगर – शहरात प्रथमच अशा अगळ्या वेगळ्या सोहळ्याचे आयोजन केले होते. फिल्मफेअर अवॉर्ड सारखा हा सोहळा रंगला. नगर मधील विविध क्षेत्रात जसे वैद्यकीय, अभियांत्रिकी, बँकींग, शैक्षणिक, व्यापार, राजकीय क्षेत्रात कार्य करणारे पण गायनांचा छंद जोपासणारे गायक जे अनेक वर्षापासुन गायन कला क्षेत्रात आपले योगदान देत आहे. अशा गायकांना खास पुरस्कार देवुन सन्मानित करण्यात आले.

पंचमदा फॅन्स फौंडेशनचे गायक प्रा. संदिप भुसे, डॉ. सत्तार सयद, इंजिनिअर अजय दगडे, व्यावसायिक अभय कांकरीया, सारंग पधाडे, एस्तेर पवार, समीर खान, विद्या तन्वर, नेहा ओस्तवाल, राजू सावंत, पवन फिरोदिया, विकास खरात, किरण अजागरे यांना पुरस्कार देवुन सन्मानित करण्यात आले.

यावेळी सर्व गायकांनी आपली बहारदार गीते सादर केली. डॉ. सत्तार सयद यांनी गुलाबी आंखे, अभय कांकरीया यांनी कई बार युही देखा है, क्या खुब लगती हो, संदीप भुसे यांनी एक सनम चाहीए आशिकी के लिए, तु मिले दिल खिले, अजय दगडे यांनी चला जाता हु एस्तेर पवार यांनी तु तु है, वोहि सारंग पधाडे यांनी न जाने कोई कैसी है, विद्या तन्वर यांनी मुझको हुती ना खबर, असे गीते सादर केली. संदीप भुसे यांच्या मिमिकीने विशेष रंगत आणली.

# उपप्रवर्तनी किरणसुधाजी म सा आदि ठाणा ८ यांचा आनंदधाम येथे सन २०२६ मध्ये चातुर्मास घोषित



नगर – राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री आनंदऋषिजी महाराज साहेब यांच्या पदस्पर्शाने शहरातील पवित्र स्थान आनंदधाम येथे धर्मप्रेमी श्रद्धाशील श्रावक श्राविकांना चातुर्मासिक धर्म आराधना करण्यासाठी कर्नाटक गज केशरी श्री गणेशलालजी म. सा. यांच्या सुशिष्या, महाराष्ट्र प्रवर्तिनी श्री प्रभाकंवरजी म. सा. यांच्या सुशिष्या तथा आचार्य सम्राट श्री शिवमूनिजी म.सा., महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म. सा.यांचे आज्ञानुवर्तीनी उपप्रवर्तनी श्री किरणसुधाजी म. सा.आदि ठाणा ८ यांचा आनंदधाम येथील वर्ष २०२६ चातुर्मास घोषित करण्यात आला आहे.

साध्वीवृंदांचा आनंदधाम येथे सन २०२६ चा मंगलमय चातुर्मास होणार आहे. संपूर्ण भारतभर जैन धर्माचा प्रचार प्रसार करून त्यांनी अनेक भाविक भक्तांना धर्म आचरण बाबत जागृत करून मोलाचे मार्गदर्शन केले आहे. श्रमण संघास त्यांचे अनमोल मार्गदर्शन नेहमीच मिळते याबद्दल त्यांना श्रमण संघीय उपप्रवर्तनी ही पदवी देण्यात आली असून त्यांचे लाखो भाविक भक्त आहेत. महाराज साहेबांचा जीवन परिचय प्रेरणादायक आहे. धर्म आराधना कशी असावी, ध्यान साधना कशी करावी, जीवन कसे जगावे याबाबत स्वाध्याय करुन त्यांनी आपले संयम जीवन सार्थ केले आहे. त्यांना गुरुदेवांचा व गुरुमातांचा आशीर्वाद, सानिध्य, मार्गदर्शन मिळालेले आहे.

धर्मप्रेमी श्रद्धाशील श्रावक श्राविकांना चातुर्मासिक आराधना करण्यासाठी या साध्वीजींचे बहुमूल्य मार्गदर्शन व विविध धार्मिक कार्यक्रमाचा, प्रवचनाचा लाभ होणार आहे. याबाबत खास युवक युवती व महिलांकरिता या चातुर्मासात त्यांचे अनमोल ज्ञान व मार्गदर्शन अहिल्यानगरवासीयांना मिळणार आहे, असे श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमल मुनोत यांनी सांगितले.





महाकुंभमेळा २०२५ निमित्त वर्कशॉप ट्रेनर म्हणून 'टाटा'कडून निवड झालेले सिद्धार्थ भिंगारकर. समवेत पोलिस अधिकारी.

# महाकुंभमेळा २०२५ निमित्त वर्कशॉप ट्रेनर म्हणून 'टाटा'कडून प्रथमच अहिल्यानगरमधील सिद्धार्थ भिंगारकर यांची निवड

## प्रयागराज पोलीस खात्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन

नगर – प्रयागराज येथे महा कुंभमेळा २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. या कुंभमेळ्याच्या तयारीकरिता पोलीस खात्यातील आय.जी., एस. एच. ऑफिसर्स, कॉन्स्टेबल अशा विविध पोलीस खात्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सच्या वतीने प्रयागराज येथे करण्यात आले होते.

सांस्कृतिक संवेदनशीलता, गर्दीचे व्यवस्थापन, संवाद, तणाव व्यवस्थापन आणि स्त्री-पुरुष संवेदनशीलता या पाच विषयांवर प्रयागराज महाकुंभमेळ्यानिमित्त बंदोबस्तासाठी असणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी तीन दिवशीय शिबिर घेण्यात आले. या शिबिरात वरील विषयांवर मार्गदर्शन करण्यासाठी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स यांच्याकडून अहिल्यानगरमधील एसव्हीएन ट्युटोरियल्सचे सहसंचालक सिद्धार्थ भिंगारकर यांची वर्कशॉप ट्रेनर म्हणून निवड करण्यात आली होती. या शिबिरात प्रशिक्षणार्थींनी चांगला प्रतिसाद दिला.

# सारडा महाविद्यालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमाचे आयोजन



पेमराज सारडा महाविद्यालयाच्यावतीने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमानिमित्त ग्रंथप्रदर्शन.

नगर – पेमराज सारडा महाविद्यालयाच्या वतीने 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रमानिमित्त महाविद्यालयात १ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत वाचन पंधरवाडा आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून महाविद्यालयातील ज्ञानस्त्रोत केंद्राच्या वतीने ३० व ३१ डिसेंबरला ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी उपप्राचार्य व ग्रंथालय समितीचे चेअरमन प्रा. मिलिंद देशपांडे, समन्वयक डॉ.स्वाती रोकडे, एनएसएस प्रमुख डॉ. कृष्णा पाटील, डॉ. प्रतीक्षा गंगावणे, डॉ. संगीता शेळके, प्रबंधक अशोक असेरी, ग्रंथपाल डॉ. राजेंद्र मारवाडे व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी, साहित्यिक उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात वाचनाचे वैयक्तिक आणि सामाजिक जीवनातील महत्त्वाचे स्थान असल्याचे सांगून ज्ञान संपन्न आणि भाषा समृद्ध समाज घडविण्यासाठी वाचन संस्कृतीचे जतन केले पाहिजे. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकासामध्ये भाषा ही अतिशय महत्त्वाची भूमिका बजावत असते. विद्यार्थ्यांनी आजच्या डिजिटल युगात वावरत असताना ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञानाधारित कौशल्य आणि माहिती आत्मसात करण्यासाठी विद्यार्थी दशेतच अभ्यासक्रमा व्यतिरिक्त अवांतर पुस्तकाचे वाचन देखील केले पाहिजे. या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना स्वत:ला सिद्ध करायचे असेल तर दररोज काहीतरी वाचन करून लिहिलेच पाहिजे. महाविद्यालयातील ज्ञानस्त्रोत केंद्राच्या ग्रंथप्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांना वाचनाची प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

या ग्रंथप्रदर्शनात विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी नामांकित लेखक, प्रकाशकांची पुस्तके, कथा, कादंबरी, थोर पुरुषांची चरित्रे, आत्मचरित्र, महाराष्ट्रातील समाजसुधारक, कविता, नाटक, प्रवास वर्णन इत्यादी वाचनीय साहित्य उपलब्ध करून दिले होते. या कार्यक्रमास हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष अॅड. अनंत फडणीस, कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन सुमतिलाल कोठारी यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत ग्रंथप्रदर्शन विद्यार्थ्यांसाठी खुले राहील.

प्रास्ताविक ग्रंथपाल डॉ. राजेंद्र मारवाडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एनएसएस समन्वयक प्राध्यापक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले. आभार डॉ. रुपाली दळवी यांनी मानले. ग्रंथप्रदर्शन यशस्वी करण्यासाठी ग्रंथालयातील संत शिंदे, सुनील नेटके, बाबासाहेब दरंदले, चेतन सूर्यवंशी, प्रदीप दळवी, शैलेश कुकडे यांनी परिश्रम घेतले.

१ जानेवारी रोजी महाविद्यालयातील मराठी, हिंदी, इंग्रजी, ग्रंथालय, एनएसएस विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी सामुहिक वाचन बहुउद्देशीय सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. विद्यार्थी विद्यार्थिनींना ग्रंथालयाच्या मुक्त प्रवेशद्वार पद्धतीने त्यांच्या आवडीनुसार अवांतर वाचनाचे कोणतेही पुस्तक घेऊन बहुउद्देशीय सभागृहात सामुहिक वाचनाची व्यवस्था करण्यात आली आहे. पुस्तक परीक्षण व कथन कार्यशाळेबाबत प्रा.डॉ. माधुरी दीक्षित, प्रा.डॉ.प्रतीक्षा गायकवाड विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

१६ जानेवारीला सारडा विद्यालयात पुस्तक परीक्षण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. पुस्तक परीक्षण स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांकाच्या विजेत्यांना प्रमाणपत्र व पारितोषिकांचे वितरण २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाच्या समारंभात केले जातील. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी पुस्तक परीक्षण स्पर्धेत सहभाग नोंदवावा असे आवाहन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

# संत जगनाडे महाराजांचे विचार जीवनात प्रत्येकाने अंगीकारले पाहिजे

## ह.भ.प. रामदास महाराज क्षीरसागर यांचे प्रतिपादन; तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने संताजी महाराज पुण्यतिथीनिमित्त शोभायात्रा





तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने संताजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त भव्य शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी ह.भ.प. रामदास महाराज क्षीरसागर, ट्रस्टचे अध्यक्षा सौ. निता लोखंडे, उपाध्यक्षा शोभना धारक, सचिव शशिकांत देवकर, खजिनदार प्रकाश सैंदर, विश्वस्त प्रसाद शिंदे, मनोज क्षिरसागर, सागर काळे, गोकूळ कोटकर, दत्तात्रय डोळसे आदिंसह समाज बांधव उपस्थित होते.

नगर – महाराष्ट्राला अनेक संतांची मोठी परंपरा आहे, या संतांनी आपल्या त्यागातून समाजाला जागृत करुन दिशा देण्याचे काम केले आहे. संत संताजी महाराजांनी आपला प्रपंच, व्यवसाय आणि समाज यात उत्तम संतुलन साधत समाजोन्नत्तीचे काम केले त्यांचे विचार आणि कार्य आजही आपणा सर्वांसाठी प्रेरणादायी आहेत. त्यांचे विचार जीवनात प्रत्येकाने अंगीकारले पाहिजे. तिळवण तेली समाज ट्रस्ट त्यांच्या विचारावर काम करुन समाजोन्नत्तीचे काम करत आहे, असे प्रतिपादन ह.भ.प. रामदास महाराज क्षीरसागर यांनी केले.

तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने संताजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त शोभायात्रा काढण्यात आली. यांप्रसंगी ह.भ.प. रामदास महाराज क्षीरसागर, ट्रस्टचे अध्यक्षा सौ. निता लोखंडे, उपाध्यक्षा शोभना धारक, सचिव शशिकांत देवकर, खजिनदार प्रकाश सैंदर, विश्वस्त प्रसाद शिंदे, मनोज क्षिरसागर, सागर काळे, गोकुळ कोटकर, दत्तात्रय डोळसे आदिंसह समाज बांधव उपस्थित होता.

यावेळी ट्रस्टचे अध्यक्षा नीता लोखंडे म्हणाल्या कि, ट्रस्टच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांच्या उन्नत्तीसाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. या उपक्रमातून समाजाला फायदा होत आहे. समाजाच्या प्रगतीसाठी ट्रस्ट कटीबद्ध असून, संत जगनाडे महाराजांचे विचार व कार्य सर्वांपर्यंत पोहचविण्याचे काम आपणा सर्वांना करावयाचे असल्याचे सांगितले.

या शोभायात्रे मध्ये फुलांनी सजविलेल्या रथामध्ये संताजी महाराज यांची मूर्ती ठेवण्यात आली होती. यावेळी महिला व पुरुष सर्वजण फेटे परिधान करून तसेच लहान मुले विविध संतांच्या वेशभूषेत सहभागी झाले होते. शहर च्या विविध भागातून ही शोभायात्रा काढण्यात आली. यानंतर मंदिरामध्ये आरती करून महाप्रसादचे वाटप करण्यात आले. ७ दिवस सुरु असलेले पारायणाची सांगता यावेळी झाली. कार्यक्रमास समाज बांधव, महिला, पुरुष, युवा वर्ग, जेष्ठ नागरिक उपस्थित होते.



सामाजिक, धार्मिक व पर्यावरण क्षेत्रातील निस्वार्थ कार्याबद्दल विजय भालसिंग यांना कोल्हापूर येथील आई महालक्ष्मी संमेलनात ग्रेट महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# ग्रेट महाराष्ट्र गौरव पुरस्काराने विजय भालसिंग सन्मानित

नगर – सामाजिक, धार्मिक व पर्यावरण क्षेत्रातील निस्वार्थ कार्याबद्दल विजय भालसिंग यांना कोल्हापूर येथील आई महालक्ष्मी संमेलनात ग्रेट महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. चित्रपट अभिनेते संजय खापरे व उद्योजिका पूनम मोरे यांच्या हस्ते भालसिंग यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी संमेलनाचे स्वागत अध्यक्ष व निमंत्रक प्रा.डॉ. बी.एन. खरात, स्वप्नपूर्ती फाऊंडेशनचे डॉ. मोहन गोखले आदी उपस्थित होते. समृद्धी प्रकाशन, स्वप्नपूर्ती फाऊंडेशन, जिद्द फाऊंडेशन, वेद फाऊंडेशन, स्वामी इंटरप्राईजेसच्या संयुक्त विद्यमाने शाहू स्मारक भवन, दसरा चौक येथे आई महालक्ष्मी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्यात विविध क्षेत्रात पुरोगामी विचाराने निस्वार्थपणे कार्य करणाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

# नगर शहरात १० जानेवारीला जिल्हास्तरीय 'ब्युटी टॅलेंट शो'

## आंतरराष्ट्रीय मेकअप आर्टिस्ट अलका गोविंद महिला व युवतींना करणार मार्गदर्शन



नगर – सावेडी, गुलमोहर रोड येथील कोहिनूर मंगल कार्यालयात १० जानेवारी रोजी ब्युटी टॅलेंट शोचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये आंतरराष्ट्रीय मेकअप आर्टिस्ट अलका गोविंद ब्युटी पार्लर प्रशिक्षणाबाबत महिला व युवतींना मोफत मार्गदर्शन करणार असल्याची माहिती मेकअप आर्टिस्ट कावेरी कैदके, विद्या सोनवणे, आरती शिंदे व जयश्री शिंदे यांनी दिली.

नेहरु युवा केंद्र, जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या माध्यमातून राष्ट्रीय युवा सप्ताहाचे औचित्य साधून जिल्हास्तरीय ब्युटी टॅलेंट शोचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी १ वाजता या कार्यशाळेला प्रारंभ होणार आहे. दिवसेंदिवस अत्याधुनिक पद्धतीने शास्त्रोक्त पद्धतीने मेकअप करण्याची कला बाजारात प्रचलित होत आहेत. सौंदर्याबाबत महिला देखील जागृत झाल्या असून, सौंदर्य खुलवण्यासाठी विविध प्रकारे काळजी घेतली जात असताना महिला व युवतींना याचे अद्यावत ज्ञान दिले जाणार आहे. बाजारात नव्याने आलेले सौंदर्य प्रसाधने, त्वचेला हानी न पोहोचविता करता येणारी उपाययोजना व सुंदरता वाढविणे आदी विविध तंत्रज्ञानाची माहिती देखील या सेमिनार मधून मिळणार आहे.

ब्युटी क्षेत्रात चांगले करिअर करण्याची व महिलांना स्वयंरोजगारीची संधी निर्माण करून देण्याच्या उद्देशाने सेमिनार व ब्युटी टॅलेंट शोचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये सहभागासाठी होण्यासाठी ९९२१७१२३१२ व ९६५७५११८६९ यावर संपर्क साधून नाव नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले. यामध्ये सहभागी होणाऱ्या सर्व ब्युटीशियन महिलांना प्रमाणपत्र दिले जाणार असल्याचे म्हंटले आहे.

# नगरच्या भाई सथ्था नाईट हायस्कूलने कबड्डीत पटकाविले उपविजेतेपद



नगरच्या भाई सथ्था नाईट हायस्कूलचा कबड्डीत उपविजेतेपद मिळविलेला संघ.

नगर – शहरातील भाई सथ्था नाईट हायस्कूलने पुणे येथे झालेल्या आंतर रात्र शालेय क्रीडा महोत्सवात कबड्डी स्पर्धेत उपविजेतेपद पटकाविले. तर विविध क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली. रात्र शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मासूम संस्थेच्यावतीने नुकतेच क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

रात्रशाळेतील प्रवेशित विद्यार्थी वयाने मोठी असल्याने शालेय स्पर्धेत त्यांना सहभागी होता येत नाही. या विद्यार्थ्यांना विविध क्रीडा स्पर्धेचा आनंद घेता यावा व त्यांच्यातील कौशल्य दाखविण्याच्या उद्देशाने मासूम संस्थेने या स्पर्धेचे आयोजन केले होते. या क्रीडा मेळाव्यात सांघिक मुलांसाठी कबड्डी, मुलींसाठी डॉजबॉल वैयक्तिकमध्ये मुला-मुलींसाठी १०० मीटर, ५० मीटर धावणे या स्पर्धेचा समावेश होता.

या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन मासूमचे एनएसटीपी विभागाचे सिनिअर प्रोग्राम हेड संदीप शेलार, प्रोग्राम हेड निलेश ठोंबरे, भाई सथ्था नाईट हायस्कूलचे मुख्याध्यापक व मासूम संस्थेचे सल्लागार समितीचे सदस्य सुनील सुसरे यांच्या हस्ते झाले. यावेळी शिक्षक गजेंद्र गाडगीळ, बाळू गोरडे, कैलास करांडे, अशोक शिंदे आदी उपस्थित होते.

कबड्डी स्पर्धेत अटीतटीचे सामने रंगले होते. भाई सथ्था नाईट हायस्कूलचा अंतिम सामना खडकी रात्रप्रशाले बरोबर रंगला होता. यामध्ये काही गुणांनी भाई सथ्था नाईट हायस्कूलला पराभवाचा सामना करुन उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. भाई सथ्था नाईट हायस्कूलच्या कबड्डी संघात अक्षय कोतकर (कर्णधार), सागर साळवे (उपकर्णधार) विशाल भोसले, प्रज्वल राजगुरू, आदित्य कुसमुडे, जुनेद पठाण, शेहबाज शेख, कुश कांबळे, धनंजय साठे, भावेश भिंगारदिवे या खेळाडूंचा सहभाग होता.

नाईट हायस्कूलच्या संघाने उपविजेतेपद मिळविल्याबद्दल सहभागी विद्यार्थी संघ व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, कार्याध्यक्ष अनंत फडणीस, मानद सचिव संजय जोशी, ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा, अजित बोरा, रात्रशाळेचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

रात्र शाळेच्या विद्यार्थ्यांना खेळाची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी क्रीडा मेळावा आयोजित केल्याबद्दल मासूम संस्थेच्या संचालिका निकिता केतकर, संचालक कमलाकर माने, युवराज बोराडे व मासूम संस्थेची सर्व टीम व स्पर्धेच्या आयोजनासाठी आर्थिक मदत करणाऱ्या बजाज फिन्सर्व या कंपनीचे सल्लागार सदस्य सुनील सुसरे यांनी आभार मानले.

# योगदान हॉस्पिटलमध्ये १ जानेवारी रोजी मुळव्याध, भगंदर मोफत तपासणी शिबिराचे आयोजन

नगर – योगदान हॉस्पिटल व मोहिनी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने योगदान हॉस्पिटलच्या ३३ व्या वर्धापन दिन निमित्ताने १ जानेवारी रोजी मोफत मुळव्याध भगंदर तपासणी, मोफत औषधोपचार व अल्प दरामध्ये शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. गरजू रुग्णांनी ३१ डिसेंबरपूर्वी नावनोंदणी करावी. मुळव्याध, भगंदर गरजू रुग्णांनी चिकित्सा घेण्यासाठी या संधीचा लाभ घ्यावा. तज्ज्ञ डॉ. संजय पुंड, डॉ. रजनिकांत पुंड, डॉ. शरद ठुबे, डॉ. सौ. मनिषा पुंड तपासणी मोफत करणार आहेत. डॉ. सौ. मनिषा पुंड, डॉ. संगिता कुलकर्णी (भुलतज्ञ) स्त्री रुग्णांची तपासणी करणार आहेत. रुग्णांनी डॉ. सौ. मनिषा पुंड यांच्याशी नाव नोंदणीसाठी संपर्क करावा. संपर्क :- (०२४१) २३२४१७९, २३२२६१८, मो. ९८२२३१६६४२, डॉ. रजनिकांत पुंड यांच्याशी नाव नोंदणीसाठी संपर्क साधावा. मो. ९४२१३३४५२८. योगदान सुपर स्पेशालिटी रिसर्च अॅण्ड ट्रेनिंग सेंटर फॉर पाईल्स अॅण्ड पंचकर्म, पुष्करराज पॅलेस, बागडे मळा, बालिकाश्रम रोड, नगर येथे शिबीर होणार आहे.

# प्रमोदसुधाजी म.सा. यांच्या अमृतमहोत्सवी दीक्षा दिनानिमित्त आनंदधाम येथे १२ जानेवारीपासून तीनदिवसीय विशेष कार्यक्रम

## जैनिझम प्रोजेक्ट प्रदर्शनात सहभागी होण्याचे आवाहन



नगर – भारतमाता प्रवर्तिनी प्रमोदसुधाजी म.सा. यांच्या अमृतमहोत्सवी (७५ वर्ष) दीक्षा दिनानिमित्त नगरमध्ये आनंदधामच्या पवित्र प्रांगणात तीन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म. सा, प्रबुध्द विचारक श्री आदर्शऋषिजी म.सा., प्रवर्तक श्री प्रकाशमुनिजी म. सा, संस्कार दिवाकर श्री आलोकऋषिजी म. सा., साध्वी श्री सत्यप्रभाजी म. सा., श्री दिव्यदर्शनाजी म. सा., श्री विश्वदर्शनाजी म.सा. आदि साधू साध्वीजींच्या सान्निध्यात १२ ते १४ जानेवारी २०२५ या कालावधीत सदर कार्यक्रम होणार आहेत.

१२ जानेवारी रोजी सकाळी ९ ते १० यावेळेत जाप व प्रवचन होणार आहे. याच दिवशी दुपारी १२.३० ते ४ यावेळेत जैनिझम प्रोजेक्ट प्रदर्शन व फन फेअर कार्यक्रम होईल. ९ ते १६ वर्षे वयोगटातील मुलेमुली व १६ वर्षांपुढील खुल्या गटात प्रोजेक्ट सादर करता येतील. जैनिझमशी संबंधित ४ गति, ६ लेश्या, ६ काया, ८ कर्म, ९ तत्व, १२ भावना, १८ पापस्थान, ७ कुव्यसन, ६ आरा, ४ कषाय, समवशरण, आनंदधाम, आनंदऋषिजी हॉस्पिटल, प्रमोदसुधाजी म. सा. दीक्षा प्रसंग, आनंदधाम येथील रचनात्मक कार्य आदि विषयांवर प्रोजेक्ट सादर करता येतील. प्रोजेक्ट घरूनच बनवून आणायचे आहेत. सहभागी होणाऱ्यांनी स्टॉल बुकींगसाठी प्रोजेक्टच्या विषयासह ५ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत आनंदधाम येथे नाव नोंदणी करणे अनिवार्य आहे. दोन्ही गटातील सर्वोत्कृष्ट पाच प्रोजेक्टला पुरस्कार दिले जाणार आहेत. पुरस्काराचे लाभार्थी सौ.मनिषा सुभाष बेदमुथा, निगडी (पुणे) व सो. चंद्रकलाबाई पोपटलाल कटारिया, महावीर नगर (अहिल्यानगर) या आहेत.

१३ जानेवारी रोजी सकाळी ९ ते १० यावेळेत जाप, प्रवचन व गुणानुवाद सभा होईल. १४ जानेवारी मकर संक्रांतीच्या दिवशी सकाळी ८ ते ९ यावेळेत गुरूदेवांचा मंगल पाठ व मंगल आशिर्वाद कार्यक्रम होणार आहे. अधिक माहितीसाठी मनिषा मुनोत (मो. ९४२३७९१५०५) यांच्याशी संपर्क साधावा.

या तीन दिवसीय कार्यक्रमांत जास्तीत जास्त श्रावक श्राविकांनी परिवारासह उपस्थित राहावे असे आवाहन श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ, श्री तिलोकरत्न जैन स्थानकवासी धार्मिक परीक्षा बोर्ड, अहिल्यानगर यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू बनवणे स्पर्धेत सावेडीतील 'समर्थ'च्या कुमुदिनी सोनवणेचे यश



महात्मा जोतिबा फुले पुण्यतिथी निमित्त घेण्यात आलेल्या आंतरशालेय टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू बनवणे स्पर्धेत कु. कुमुदिनी प्रवीण सोनवणे हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल दीपक ओहोळ यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

नगर – महात्मा फुले एज्युकेशन सोसायटीच्या केशवराव गाडीळकर हायस्कूल, अ. नगरतर्फे महात्मा ज्योतिबा फुले पुण्यतिथी निमित्त घेण्यात आलेल्या आंतरशालेय टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू बनवणे या स्पर्धेत श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला, प्राथ.विभाग सावेडीची इयत्ता चौथी मध्ये शिकणारी कु. कुमुदिनी प्रवीण सोनवणे या विद्यार्थिनीने द्वितीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल श्री समर्थ विदया प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष दीपक ओहोळ यांच्या हस्ते सन्मान करण्यात आले. मुख्याध्यापिका धनश्री गुंफेकर यावेळी उपस्थित होते.

कुमुदिनी सोनवणेने टाकाऊ वस्तूंचा वापर करून सुंदरसे भेटकार्ड बनवले. तिच्या या यशासाठी श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष दीपक ओहोळ, चेअरमन विकास सोनटक्के, व्हा. चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, सचिव प्र. स. ओहोळ, सचिव व शालेय समिती चेअरमन सुरेश क्षीरसागर व सर्व विश्वस्त, मुख्याध्यापिका धनश्री गुंफेकर व वर्गशिक्षिका वृषाली कुलकर्णी यांनी अभिनंदन केले.



संग्राम जगताप तिसऱ्यांदा आमदारपदी निवडून आल्याबद्दल महाराष्ट्रातील सर्व कुस्तीगीरांच्या वतीने सत्कार करण्यात आला. (छाया – लहू दळवी

# नगर शहरात होणाऱ्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या नियोजनाची बैठक

## जानेवारी महिन्यात स्पर्धेचे उद्‌घाटन

नगर – महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघातील पदाधिकाऱ्यांची आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली जानेवारी महिन्यात शहरात होणाऱ्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या नियोजनाची बैठक झाली. यावेळी तिसऱ्यांदा आमदारपदी निवडून आल्याबद्दल महाराष्ट्रातील सर्व कुस्तीगीरांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष पै. संदिप आप्पा भोंडवे, सरचिटणीस हिंद केसरी पै.योगेश दोडके, महाराष्ट्र केसरी पै. सईद चाऊस, अहिल्यानगर जिल्हा कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष महाराष्ट्र केसरी पै.अशोक शिर्के, उपाध्यक्ष पै.अर्जुन देवा शेळके, सचिव प्रा.डॉ.पै.संतोष भुजबळ, जिल्हा कार्यकारिणी सदस्य पै.शंकर खोसे, पै.धनंजय खसे, निलेश मदने, पै.दत्तात्रय खैरे, पै.दादासाहेब पांडूळे, पै.अतुल कावळे, आंतरराष्ट्रीय कुस्ती पंच प्रा.संभाजी निकाळजे, नेवासा तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष प्राचार्य सोपान बाजीराव काळे सर आदी उपस्थित होते.

# राज्यातील १५ हजार पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत भाजपचे १२ जानेवारी रोजी शिर्डीत 'अधिवेशन'

## राज्यस्तरीय महाअधिवेशनाच्या नियोजनार्थ शिर्डीत पदाधिकाऱ्यांची बैठक



भारतीय जनता पार्टी चे महाधिवेशन शिर्डी जिल्हा आहिल्यानगर येथे होणार आहे. त्या अनुषंगाने तयारी व नियोजन या संदर्भात प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली व प्रदेश महामंत्र्यांच्या मार्गदशनाखाली शिर्डी येथील सेंट लॉर्न हॉटेलमध्ये बैठक पार पडली.

नगर – १२ जानेवारी २०२५ रोजी भारतीय जनता पार्टीचे महाअधिवेशन शिर्डी जिल्हा अहिल्यानगर येथे होणार आहे. त्या अनुषंगाने तयारी व नियोजन या संदर्भात प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली व प्रदेश महामंत्र्यांच्या मार्गदशनाखाली शिर्डी येथील सेंट लॉर्न हॉटेलमध्ये बैठक पार पडली. या बैठकीत त्यांनी आयोजनातील पदाधिकाऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

सदरील बैठकीला विधानपरिषदेतील पक्षाचे मुख्य प्रतोद प्रविण दरेकर, प्रदेश महामंत्री संजय केनेकर, महामंत्री रणधीर सावरकर, महामंत्री राजेश पांडे, महामंत्री आ.विक्रांत पाटील, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, कार्यालयीन प्रभारी रवि अनासपुरे, महामंत्री श्रीमती माधवीताई नाईक, माजी खासदार सुजय विखे पाटील, आ.शिवाजीराव कर्डिले, आमदार मोनिकाताई राजळे, संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित होते.

विधानसभेच्या निवडणुकीच्या विजयानंतर भाजपाचे राज्यस्तरीय महाअधिवेशन शिर्डी येथे १२ जानेवारीला होणार आहे. या राज्यस्तरीय अधिवेशनासाठी भारतीय जनता पार्टीच्या १५००० महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती राहणार आहे. यासाठी शिर्डी येथे चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली भाजप कोअर कमिटीची बैठक झाली. या बैठकीत राज्यस्तरीय महाअधिवेशनाची बैठक व्यवस्था, भोजन व्यवस्था, पार्किंग व्यवस्था, व्हीआयपी कक्ष, स्वागत कक्ष या व्यवस्थांकडे विशेष लक्ष देण्यात येत आहे. तसेच या राज्य अधिवेशनात राज्य सरकार व केंद्र सरकारने केलेली विकास कामे व योजनांच्या माहितीचे प्रदर्शन हे अधिवेशनाचे मुख्य आकर्षण ठरेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार शिर्डी येथे महाअधिवेशन पार पाडणार आहे, अशी माहिती चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे.

या नियोजन बैठकीसाठी अहिल्यानगर भारतीय जनता पार्टी कोअर कमिटीचे स्नेहलता कोल्हे, उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर, दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, ओबीसी मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, अक्षय कर्डिले, सचिन पेटारे, संतोष म्हस्के, सौ.आश्वीनी थोरात, बाळासाहेब गाडेकर, भानुदास बेरड, विनायक देशमुख, योगिराज प्रतिष्ठान अध्यक्ष सचिन शुक्ल, त्रंबकेश्वर शहराध्यक्ष प्रशांत बागडे, प्रसाद मुळे, वैभव जोशी, प्रमोद जोशी, विवेक नाईक, बाबासाहेब वाकळे, सचिन पारखी, प्रशांत मुथ्था, महेश नामदे, पंडित वाघमारे, मयूर बोचूघोळ, साहिल शेख, प्रिया जानवे, सविता कोटा आदींसह उत्तर व दक्षिण जिल्ह्यातील प्रतिनिधी उपस्थित होते.

# तीन टक्के वाढीव महागाई भत्ता तात्काळ लागू करावा



सुनिल गाडगे

नगर – केंद्र शासनाने घोषित केल्याप्रमाणे १ जुलै २०२४ पासून ३ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू करण्याचे शासन आदेश निर्गमित करण्याची मागणी शिक्षक भारती संघटनेच्या वतीने राज्य सरकारकडे करण्यात आली आहे. सदर मागणीचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांना शिक्षक भारती संघटनेच्या वतीने दिले असल्याची माहिती शिक्षक भारती संघटनेचे राज्यसचिव सुनील गाडगे यांनी दिली.

केंद्र शासनाने केंद्रीय कर्मचाऱ्यांना १ जुलै २०२४ पासून ३ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू केला आहे. महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार राज्य शासकीय कर्मचारी आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १ जुलै २०२४ पासून ३ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू करणे निकडीचे आहे. त्यामुळे १ जुलै २०२४ पासून ३ टक्के वाढीव महागाई भत्ता थकबाकीसह देण्याचा निर्णय राज्य शासनाने घोषित करावा, अशी राज्यातील शिक्षक, कर्मचाऱ्यांची भावना असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

केंद्र शासनाने घोषित केल्याप्रमाणे १ जुलै २०२४ पासून ३ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू करावा, यासाठी शासन आदेश त्वरित निर्गमित करून थकबाकीसह वाढीव महागाई भत्ता जानेवारी २०२५ च्या वेतनासोबत वितरित करण्याची मागणी शिक्षक भारती संघटनेच्या वतीने सुनील गाडगे, जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, अहमदनगर महिला जिल्हाध्यक्षा सौ. आशा मगर, जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब लोंढे, कैलास जाधव, जिल्हासचिव विजय कराळे, उर्दू जिल्हाध्यक्ष मोहंमद समी शेख, उच्च माध्यमिकचे जिल्हाध्यक्ष रामराव काळे, जिल्हा सचिव महेश पाडेकर, कार्याध्यक्ष किशोर डोंगरे, संभाजी पवार, कार्यवाह संजय भुसारी, हनुमंत रायकर, नवनाथ घोरपडे, सिकंदर शेख, संजय पवार, संतोष देशमुख, किसन सोनवणे, सोमनाथ बोंतले, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, जॉन सोनवणे, महिला जिल्हाध्यक्ष आशा मगर, सचिव विभावरी रोकडे, कार्याध्यक्ष मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुज, छाया लष्करे, जया गागरे, अनघा सासवडकर, रूपाली बोरुडे, सोनाली अकोलकर, विनाअनुदानितच्या राज्यअध्यक्षा रूपाली कुरूमकर आदींनी मागणी केली आहे.



जिल्ह्यातील शिक्षक, शिक्षकेतरांना पीएफच्या मार्च २०२४ अखेरच्या पावत्या मिळाव्या, या मागणीचे निवेदन शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांना देण्यात आले.

# जिल्ह्यातील शिक्षक, शिक्षकेतरांना पीएफच्या मार्च २०२४ अखेरच्या पावत्या मिळाव्यात

नगर – जिल्ह्यातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना शिक्षण विभागाकडून भविष्य निर्वाह निधीच्या मार्च २०२४ अखेरच्या पावत्या मिळण्याची मागणी महाराष्ट्र राष्ट्र शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांच्या नेतृत्वाखाली शिक्षकांच्या शिष्टमंडळाने शिक्षणाधिकारी अशोक कडूस व वेतनपथक अधिक्षक रामदास म्हस्के यांची भेट घेऊन सदर प्रश्नी निवेदन देऊन सर्व वैद्यकीय व पुरवणी बीले मिळण्याबाबतही चर्चा केली. यावेळी माध्यमिक शिक्षक संघाचे राजेंद्र लांडे, शिक्षकेतर संघटनेचे विभागीय सचिव गोवर्धन पांडुळे, प्रा. सुनिल शिंदे, संजय शिरसाट, दिनकर मुळे, वैभव सांगळे, रोहीदास पुंड, अशोक आव्हाड आदी उपस्थित होते.

वेतनपथक अधिक्षक म्हस्के यांनी सदर प्रश्नाची तातडीने दखल घेऊन जानेवारीच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात विशेष कॅम्पद्वारे ऑफलाइन पद्धतीने पीएफच्या पावत्या दिल्या जाणार असल्याचे आश्वासन दिले. तर वैद्यकीय देयकासंदर्भात शिक्षण उपसंचालकांशी चर्चा करून हा प्रश्न देखील मार्गी लावला जाणार असल्याचे स्पष्ट केले.

शिक्षण विभागाकडून जिल्ह्यातील सर्व विद्यालयांना सन २०२१–२२ सालापर्यंत भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या मिळालेल्या आहेत. यासाठी सर्व विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधीचे खाते विशेष कॅम्पद्वारे ऑनलाईन अपडेट केलेली आहेत. परंतु आजतागायत यापुढील भविष्य निर्वाह निधीच्या ऑनलाइन किंवा ऑफलाइन स्लिपा मिळालेल्या नाहीत. त्यामुळे कर्मचाऱ्यांना पीएफ खात्यातून कर्ज काढायचे असल्यास सन २०२१–२२ सालापर्यंतचे शिल्लक रकमेवर कर्ज मंजूर केले जात असल्याच्या तक्रारी घेऊन अनेक शिक्षक, कर्मचारी संघटनेकडे तक्रार घेऊन येत आहेत. या रकमेत पुढील दोन वर्षाचा हिशोब धरला जात नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

मार्च २०२४ अखेरच्या भविष्य निर्वाह निधीच्या स्लीपा ऑनलाईन किंवा ऑफलाइन पद्धतीने विशेष कॅम्प आयोजित करून तात्काळ सर्व कर्मचाऱ्यांना मिळाव्या, जिल्ह्यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे सर्व प्रकारच्या पुरवणी देयके, वैद्यकीय देयके व मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर आणि सेवानिवृत्त यांचे रजा रोखीकरणाचे देयके लवकरात लवकर अदा करण्याची मागणी शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे.


## जाहीर प्रगटन उत्तर

दि. २४.१२.२०२४ रोजीचे दैनिक नवा मराठा मध्ये ॲड. समीर वखारे यांनी अब्दुल गफुर मोहम्मद शफी रंगरेज तर्फे दिलेले जाहीर प्रगटनास उत्तर देत आहे त्याची नोंद घेण्यात यावी.

जिल्हा अहमदनगर, अहमदनगर महानगरपालीका हद्दीतील मौजे केडगाव येथील मिळकत गट नं. ४३७/१ तीचे क्षेत्र १हे. = ९५ आर व गट नं. ४३७/३ चे क्षेत्र १हे. = २१आर या मिळकती मध्ये आमचे अशिल मोहम्मद शफी अब्दुल सत्तार रंगरेज यांचा मुस्लिम कायद्या प्रमाणे अविभक्त हिस्सा आहे, सदर मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप झालेले नाही, व त्याकरीता मे. सिव्हील जज्ञ साहेब, अहमदनगर यांचे कोर्टात वाटपा करीता रे. मु. नं. २७९/ २०२२ चा न्याय प्रविष्ठ आहे.

आमचे अशिल मोहम्मद शफी अब्दुल सत्तार रंगरेज हे हयात असून त्यांनी त्यांचे वारस नामे अब्दुल गफुर मोहम्मद शफी रंगरेज यांना मुस्लिम कायद्यातील तरतुदी नुसार कधीही तोंडी अथवा लेखी हीबा अथवा बक्षीसपत्र करून दिलेले नव्हते व नाही, त्यामुळे महसुल दप्तरी तशी नोंद होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. आमचे अशिल मोहम्मद शफी अब्दुल सत्तार रंगरेज यांना मुस्लिम कायद्याच्या तरतुदी प्रमाणे त्यांचे नावावर असलेल्या मिळकतीचा अविभक्त हिस्सा कायदेशीर मार्गाने हस्तांतर करण्याचा पुर्ण अधिकार होता व आहे.

आमचे अशिलांचा मुलगा अब्दुल गफुर हा धुर्त व कटकारस्थानी वृत्तीचा असुन, काही जवळचे नातेवाईकांशी संगनमत करून त्याने आमचे अशिलांना मानसीक त्रास व आर्थिक नुकसान करण्याचे दृष्ट हेतुने खोटा, लबाडीचा मजकूर टाकून सदरची खोटे व बेकायदेशीर जाहीर प्रकटने प्रकाशीत केलेले आहे. यापुर्वीही आमचे अशिलांची अडवणुक करून रक्कम उकळण्याचे दृष्ट हेतुने मुलगा अब्दुल गफुर याने खोट्या केसेस आमचे अशिलां विरूध्द दाखल केलेल्या होत्या. सबब या नोटीस उत्तरा व्दारे तमाम लोकांस विशेषतः सदर जाहीर प्रकटन प्रकाशीत करणारे यांना सुचीत करण्यात येते की, सदर मिळकती संबंधाने कुणीही कोणत्याही प्रकाराचा व्यवहार अब्दुल गफुर रंगरेज याच्याशी करण्यास, हस्तांतरण, करार, मदार करण्यास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे याउपरही कुणीही सदर मिळकती संबंधाने कोणताही व्यवहार केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व त्यास क्लिअर टायटल मिळणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी, तसेच सदर अब्दलु गफुर रंगरेज याने दिलेल्या खोट्या व लबांडीचे जाहीर प्रकटनाचे अनुषंगाने आमचे अशिल त्याचे विरूध्द व त्याचे सोबत संगनमत करणारे इतर नातेवाईकांचे विरूध्द लवकरच कायदेशीर कार्यवाही करणार आहेत याची नोंद घ्यावी, सबब कुणाचीही फसवणुक होऊ नये म्हणून सदरचे जाहीर प्रकटनास उत्तर दिले आहे.

दिनांक : ३०/१२/२०२४
ठिकाण : अहमदनगर

**ॲड. फारूक बी. शेख**
नोटरी पब्लीक भारत सरकार
**ॲड. नुमेर एफ. शेख**
रा. नाला मस्जीद बिल्डींग, मिसाळ गल्ली,
अहमदनगर. मो. ९८२२६२२७०५ / ८०८७८६९४२३

## जाहीर प्रगटन

तमाम लोकांस या जाहिर प्रगटन व्दारे विषेशता **रविना रविंद्र लोंढे व रविंद्र भालचंद्र लोंढे** यांना कळविण्यांत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत ही मुळ मालक **भालचंद्र रभाजी लोंढे** यांचे मालकी वहिवाटीची होती व आहे. भालचंद्र रभाजी लोंढे हे मयत झाल्यानंतर त्यांचे कायदेशीर वारस नामे १. अरुण भालचंद्र लोंढे २. विलास भालचंद्र लोंढे ३. सुहास भालचंद्र लोंढे ४. रविंद्र भालचंद्र लोंढे यांच्या नावाची नोंद सि.स.चे रेकॉर्ड ऑफ राईटला लागलेली होती व आहे. सदरची मिळकत ही अदयाप पावेतो अविभक्त हिश्याची मिळकत असुन, सर्व वारसांमध्ये सदर मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. तसेच सदर मिळकती पैकी पुर्व बाजुकडील मिळकत ही आमचे अशिल नामे **१. सुषमा विलास लोंढे यांचे पती २. रोहन विलास लोंढे ३. रोहित विलास लोंढे ४. रोनक विलास लोंढे** यांचे वडील विलास भालचंद्र लोंढे यांचे ताब्यात व कब्जात होती व आहे. सदर मिळकती मध्ये प्राइड सुपर शॉपी या नावाने गिफ्ट अर्टिकल चे दुकान होते. तद्‌नंतर आमचे अशिलाने सदरची पुर्व बाजुकडील मिळकत ही लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वार अर्शद इलियास शेख यांना लायसेन्सी म्हणुन दिलेली आहे. सदर दुकान मिळकती मध्ये अर्शद इलियास शेख यांचे नगर मोटर्स या नावाने व्यवसाय चालु आहे. तसेच सदर संपुर्ण मिळकतीचे महानगरपालिकेचे टॅक्सेस विलास भालचंद्र लोंढे यांनी त्यांच्या हयातीत सन २०१७ पर्यंत भरलेले आहे. रविंद्र भालचंद्र लोंढे यांच्या ताब्यात सदर मिळकती पैकी पश्चिम बाजुकडील मिळकत असुन रविंद्र भालचंद्र लोंढे यांनी बेकायदेशीररित्या चुकीचे चतु:सिमा दर्शवुन रविना रविंद्र लोंढे यांना तथाकथीत बक्षिसपत्र लिहुन दिलेले आहे. व सदर तथाकथीत बक्षिसपत्र च्या चुकीच्या चतु:सिमा दाखवुन रविना रविंद्र लोंढे हे सदर मिळकतीचे बेकायदेशीर रित्या तिऱ्हाईत इसमास हस्तांतर / साठेखत / खरेदीखत करण्याचा प्रयत्न करीत आहे. वास्तविक पाहाता सदर मिळकत ही आज रोजी आमचे अशिल **१. सुषमा विलास लोंढे २.रोहन विलास लोंढे ३. रोहित विलास लोंढे ४. रोनक विलास लोंढे** यांचे ताब्यात व कब्जात आहे. तरी सदरच्या जाहिर प्रगटन व्दारे तमाम लोकांस कळविण्यात येते की, सदर परिशिष्टामध्ये वर्णन केलेले मिळकतीचे रविना भालचंद्र लोंढे व रविंद्र भालचंद्र लोंढ यांचे बरोबर कोणताही हस्तांतरणाचा व्यवहार करु नये. कोणताही व्यवहार केल्यांस तो आमच्या आशिलावर बंधनकारक राहणार नाही. तसेच सदर मिळकत खरेदी करणाऱ्या इसमास सदर मिळकतीचा क्लिअर व मार्केटेबल टायटल प्राप्त होणार नाही. तसेच आमचे अशिल सदर खरेदी घेणार व देणार यांचे विरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करतील. व होणाऱ्या खर्चास व परिणामास खरेदी घेणार व खरेदी देणार हे जबाबदार राहतील. कोणाचीही कोणत्याही प्रकारची फसगत होऊ नये म्हणुन सदर जाहीर नोटीस आज रोजी प्रसिध्दीस दिली आहे.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** – जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी व तालुका नगरपैकी, महानगरपालिका हद्दीतील, **गुलाबसिंग कंपाउंड** येथील खालील वर्णनाची मिळकत –

| सि.स.नं. | चौ.मी. |
|---|---|
| ७४४२ | ६९४३.०० |

यापैकी आमचे अशिल १. सुषमा विलास लोंढे २. रोहन विलास लोंढे ३. रोहित विलास लोंढे ४. रोनक विलास लोंढे यांचे ताब्यात व कब्जात असलेली पुर्व बाजुकडील वडिलोपार्जीत मिळकती बाबत.

**यांसी चतु:सिमा :**
पुर्वेस – रस्ता — दक्षिणेस – बोळ
पश्चिमेस – सदर मिळकती पैकी — उत्तरेस – बोळ

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक काही एक राखुन न ठेविता.
दि. ३०/१२/२०२४
अहमदनगर

**ॲड. नाजिम अहमद इस्माईल शेख**
**ॲड. कुरेशी फैजान फारुक**
जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, डावरेगल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६० / ७२७६२५२४७८





# श्री शुक्लेश्वर मंदिर ट्रस्टतर्फे रक्तदान व हिमोग्लोबिन तपासणी शिबिर

भिंगार – श्री शुक्लेश्वर महादेव मंदिर ट्रस्ट, भिंगार यांच्यातर्फे सालाबादप्रमाणे दत्तजयंती निमित्त श्री शुक्लेश्वर महादेव मंदिर येथे रक्तदान व महिलांसाठी हिमोग्लोबिन तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात भिंगार, नागरदेवळे आणि आसपास शहरातील २०० रक्तदात्यांनी रक्तदान केले आणि त्यामध्ये विशेष करून महिलांनी रक्तदान केले. १५० महिलांची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. सहभागींना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. या शिबिरासाठी शुक्लेश्वर मंदिर ट्रस्टचे सदस्य, सर्व सहकारी, श्री शिवमहापुराण कथेचे आयोजक समिती, मित्र परिवार व तरुण वर्गाने विशेष परिश्रम घेऊन शिबीराचे यशस्वी आयोजन केले.




प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या प्रेरक वक्त्या ब्रह्माकुमारी सरिता दीदी यांना ग्लोबल बुक ऑफ एक्सीलेंस, इंग्लंडकडून ऑनर सर्टिफिकेट देऊन सन्मानित करण्यात आले. मुंबईत गुजराथी समाज हॉलमध्ये झालेल्या भव्य कार्यक्रमात गुजराती समाजाचे उद्योजक हेमराज शहा, तारक मेहता का उल्टा चष्मा फेम जेठालालची भूमिका साकारणारे अभिनेते दिलीप जोशी व ग्लोबल बुक ऑफ एक्सीलेंस, इंग्लंडचे उपाध्यक्ष डॉ. दीपक हरके यांच्या हस्ते सरिता दीदींना सर्टिफिकेट, ट्रॉफी, मेडल व शाल देऊन सन्मानित करण्यात आले.



रात्री दहा वाजण्याच्या पूर्वीच नगर-पुणे महामार्गावरुन केडगावसह शहरात दाखल होणारी अवजड वाहने.



दिवसा नगर-संभाजीनगर महामार्गावर कोठला परिसरात मोठ्या प्रमाणात असलेली अवजड वाहनांची वर्दळ.



शहरात प्रवेश करणाऱ्या अवजड वाहनांवर कारवाई व्हावी या मागणीचे निवेदन अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांना देताना माजी नगरसेवक अनिल शेकटकर, विशाल कांबळे, मेहेर कांबळे, राहुल शेकटकर, अभय शेकटकर, गणेश पठारे, ओम अडागळे, संदेश शेकटकर, ओमकार राजगुरू, प्रकाश वाघमारे, प्रमोद शिंदे आदी.

# शहरात येणारी अवजड वाहने ठरताहेत वाहतुक कोंडी व अपघातांना कारणीभूत

नगर – वाहतुक कोंडी, अपघातांना कारणीभूत ठरत असलेल्या शहरात घुसणारी अवजड वाहतुक त्वरीत थांबविण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे. नियमांचे उल्लंघन करुन सर्रासपणे दिवसाढवळ्या व प्रतिबंध असलेल्या वेळेत शहरातून मोठ्याप्रमाणात अवजड वाहतुक विद्यार्थ्यांसह नागरिकांच्या जीवावर उठली आहे. या अवजड वाहनांमुळे अनेक लहान-मोठे अपघात घडत असून, काही महिन्यांपूर्वी बालिकाश्रम रोड, सर्वोदय कॉलनी येथे शालेय विद्यार्थ्याचा अवजड वाहनामुळे दुर्दैवी अपघाती निधन झाला होता. मात्र अद्यापि प्रशासनाने ही अवजड वाहतुक बंद केलेली नसल्याने नागरिकांमधून संतप्त भावना उमटत आहे.

शहराबाहेरील बाह्यवळण रस्त्याचे काम पूर्ण झाले असून, त्या मार्गाने वाहतूक सुरळीत झाली आहे. परंतु काही अवजड वाहने दिवसात शहरातून सर्रासपणे जात आहे. त्यामुळे संभाजीनगर कडून पुणे व सोलापूर कडे जाणारी तसेच बीड कडून जाणारी वाहने उड्डाणपुल उतरल्यानंतर शिल्पा गार्डन ते रेल्वे स्टेशन दरम्यानच्या उड्डाणपूलापर्यंत वाहतूक मोठ्या प्रमाणात ठप्प होत आहे. जवळच असणारे आनंदऋषीजी हॉस्पिटल व इतर हॉस्पिटल असून अनेक वेळा या ठिकाणी रुग्णवाहिका वाहतुक कोंडीत अडकत आहे. पुणे कडून जाणारी वाहतूक नगर शहरातून जात असल्याने शिल्पा गार्डन दरम्यान तसेच रेल्वे उड्डाणपूल उतरल्यानंतर पोलीस अधीक्षक कार्यालयापर्यंत मोठ्या प्रमाणात वाहतुकीच्या लांबच लांब

### विद्यार्थ्यांसह नागरीकांच्या जीवाशी खेळ, वाहतूक पोलिस घेताहेत बघ्याची भूमिका

रांगा लागलेल्या दिसतात. यामुळे अनेक लहान-मोठे अपघात घडत असून, या वाहतूक कोंडीचा त्रास नगरकरांना सहन करावा लागत आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरामध्ये हॉस्पिटल, महापालिका, जिल्हा न्यायालय, जिल्हाधिकारी कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग आदी शासकीय कार्यालय असून, सदर ठिकाणी कामकाजाकरिता जिल्ह्यातील नागरिकांची वर्दळ असते. यामुळे सदर परिसरात वाहतुक कोंडीचा कायमचा प्रश्न उद्भवत आहे.

शहरात अनेक ठिकाणी अंतर्गत रस्त्यांचे कामे सुरु असल्याने नागरिकांना दळणवळणासाठी मुख्य रस्त्यांचा आधार घ्यावा लागत आहे. शहरात सकाळी ९ ते रात्री ९ दरम्यान अवजड वाहनांना शहरात येण्यास बंदी असताना देखील मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची वर्दळ शहरातून सुरु आहे. अनेक ठिकाणी मुख्य चौकात अवजड वाहनांमुळे वाहतुक कोंडीचा त्रास देखील नागरिकांना सहन करावा लागत आहे. शाळा भरताना व सुटताना तसेच इतर कार्यालयीन वेळेत शहरात वाहतुकीचे नियोजन नसल्याने मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे. अवजड वाहन शहरात येत असल्याने शालेय विद्यार्थ्यांसह महिला व ज्येष्ठ नागरिकांना जीव मुठीत धरुन मार्गक्रमण करावे लागत आहे.

### वाहतूक शाखेने योग्य उपाययोजना करणे आवश्यक

शहरात अवजड वाहनांना प्रवेश बंदी असताना, अवजड वाहने रस्त्यावर येत आहेत. या वाहतूक कोंडीमुळे व अवजड वाहनांच्या घुसखोरीमुळे अनेक अपघात होऊन निष्पाप नागरिकांचा जीव जात आहे. अवजड वाहनांना शहरात दिवसा येण्यास बंदी केल्यास अपघाताचे प्रमाण कमी होवून वाहतुक कोंडीचा प्रश्न देखील सुटण्यास मदत होणार आहे. शहर वाहतुक पोलीसांनी तातडीने दखल घेऊन शहरात दाखल होणारे अवजड वाहने रोखण्यासाठी उपाययोजना कराव्या, आणखी काही जणांचा बळी जाण्याची वाट न पाहता तातडीने शहरातील अवजड वाहतुक बंद होण्यासाठी अंमलबजावणी करण्याची मागणी नागरिकांमधून करण्यात आली आहे.

### अवजड वाहनांवर कारवाईची मागणी

नगर शहरात येणारी अवजड वाहतुक बाह्यवळण मार्गावरून वळवावी व शहरात प्रवेश करणाऱ्या अवजड वाहनांवर कारवाई करण्याची मागणी अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. माजी नगरसेवक अनिल शेकटकर यांच्यासह शिष्टमंडळाने खैरे यांच्याशी शहरातील वाहतुक कोंडीच्या प्रश्नाबाबत चर्चा केली. याप्रसंगी विशाल कांबळे, मेहेर कांबळे, राहुल शेकटकर, अभय शेकटकर, गणेश पठारे, ओम अडागळे, संदेश शेकटकर, ओमकार राजगुरू, प्रकाश वाघमारे, प्रमोद शिंदे आदी उपस्थित होते.

## प्रांजल सिकची सीए परीक्षेत उत्तीर्ण



नगर – इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया यांच्या वतीने नोव्हेंबर २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या सीए परीक्षेत सावेडी उपनगरातील ऐश्वर्या नगरी येथील प्रांजल दिपक सिकची हि सीए परीक्षेत उत्तीर्ण झाली आहे. प्रांजल हिने नगर येथील कानकिया ॲण्ड मेहता असोसिएट यांच्याकडे आर्टिकलशिप पूर्ण केली. तिला सीए महेश भळगट, सीए पवनकुमार दरक यांचे मार्गदर्शन लाभले.

## मंदिरासमोर लावलेल्या दुचाकीची चोरी

नगर – सावेडी परिसरातील भिस्तबाग चौकाजवळील अयप्पा स्वामी मंदिराच्यासमोर हॅण्डल लॉक करुन लावलेली होंडा कंपनीची सी बी शाईन एस पी मोटारसायकल (क्र. एम एच १६ बी एक्स ३१६२) कोणीतरी अज्ञात चोरट्याने हॅण्डेल लॉक तोडून बनावट चावीने सुरू करून चोरुन नेली. या प्रकरणी श्रीनिवास राजय्या तुमनपेल्ली,(वय ५१, रा. रामकृष्ण कॉलनी, मार्कंडेय सोसायटी जवळ, गुलमोहर रोड) यानी दिलेल्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलिसांनी चोरट्याविरुद्ध चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली.

# रेल्वे पुलावर कंटेनर बंद पडल्याने पाऊण तास वाहतूक कोंडी

### दोन्ही बाजुने वाहनांच्या लांबच लांब रांगा, वाहनचालकांना झाला प्रचंड मनस्ताप

नगर – नगर- पुणे महामार्गावरुन केडगाव मार्गे शहरात येणारी व जाणारी अवजड वाहने ही नित्याचीच बाब झाली असताना, रविवारी (दि. २९) संध्याकाळी नगर-पुणे महामार्गावरील रेल्वे पुलावर अवजड सामानाची वाहतुक करणारा कंटेनर अचानक बंद पडल्याने वाहतुक कोंडी झाली होती. यश पॅलेस चौक ते केडगाव येथील अंबिका बस स्टॉपपर्यंत संपूर्णपणे वाहतूक ठप्प झाली होती. तब्बल पाऊण तास नागरिक या वाहतुक कोंडीत अडकले होते. अवजड वाहनांनी शहरातील वाहतुकीचे तीन तेरा वाजले असून, शहर वाहतुक पोलीस बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोप नागरिकांमधून होत आहे.

वाहतुक कोंडी व अपघातांना कारणीभूत ठरत असलेल्या शहरात घुसणारी अवजड वाहनांना बंदी घालण्याची मागणी नागरिकांमधून होत असताना सर्रासपणे शहरात अवजड वाहने दिवसाढवळ्या येत आहे. छत्रपती संभाजीनगर येथून आलेला एमएच ४६ बीयू ४५६७



शहरातील कायनेटिक चौकाजवळील रेल्वे पुलावर कंटेनर बंद पडल्याने झालेली मोठी वाहतुक कोंडी छायाचित्रात दिसत आहे.

क्रमांकाचा कंटेनर केडगाव येथील रेल्वे ब्रिजवरुन पुण्याच्या दिशेने जात असताना पुल चढताना मध्येच बंद पडला. यामुळे वाहतुक कोंडी होवून रस्त्याच्या दोन्ही बाजुने वाहनांच्या रांगाच-रांगा लागल्या होत्या. तर दोन रुग्णवाहिका देखील यामध्ये अडकून पडल्या होत्या. सदर वाहतुक कोंडी सुरळीत करण्यासाठी वाहतुक पोलीस देखील वेळेवर हजर नसल्याने नागरिकांनी स्वत:हून रस्त्यावर थांबून वाहतुक सुरळीत करण्याचा प्रयत्न केला.

वाहतूक सुरळीत करण्याची कोणतीच व्यवस्था नसल्याने अनेक तास नागरिक वाहतुक कोंडीत अडकले होते. शहरात दिवसा अवजड वाहनांना बंदी असताना देखील वाहने शहरात येतात कशी? हा प्रश्नह नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

अवजड वाहनांनी अनेकांचा बळी घेतला असताना देखील, वाहतुक पोलीस कारवाईसाठी आनखी किती जणांच्या बळीची वाट पाहणार असल्याचा मुद्दा नागरिकांमधून उपस्थित करण्यात येत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याच्या आवारात हिंदू मुस्लिम मावळ्यांनी लावले स्वच्छताचे फलक

### शिवसेना युवा सेना व बस स्टँड येथील रिक्षाचालकांचा पुढाकार; कचरा टाकणारे, थुंकणाऱ्यांवर होणार कारवाई

नगर – नगर शहरातील मध्यवर्ती असलेले माळीवाडा बस स्थानक येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे येणारे जाणारे तसेच काही नागरिक अस्वच्छता ठेवतात छत्रपती शिवाजी महाराज पुतळा आवारात कचरा टाकतात, थुंकतात, अस्वच्छता ठेवतात अशा नागरिकांवर वचक बसण्यासाठी शिवसेना युवा सेना व छत्रपती शिवाजी महाराज स्मारक रिक्षा स्टॉपच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज पुतळा आवारामध्ये स्वच्छतेचे फलक लावले.



छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याच्या आवारात हिंदू मुस्लिम मावळ्यांनी लावलेले स्वच्छता फलक

येथे कोणीही कचरा टाकू नये, थूंकू नये असे आवाहन नागरिकांना करण्यात आले. यावेळी नगर शहराचे पोलीस उपाधीक्षक अमोल भारती, कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, शिवसेना युवासेनाच्या जिल्हा संघटक अमोल हुंबे पाटील, मोहन तागड, सय्यद, ईशान सय्यद, आदित्य काटे, आरिफ शेख, पिंटू भोसले, इरफान शेख, अरबाज काजी, शाहरुख शेख, विठ्ठल भाऊ, संपत धवन, अमित शेख, सोहेल काजी, शेरू शेख, समीर शेख, मोहीन मोमीन, सोहेल शेख, अल्ताफ शेख आदी उपस्थित होते

यावेळी पोलीस उपाधीक्षक अमोल भारती म्हणाले की सर्व नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराज, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, अण्णाभाऊ साठे, सर्व महापुरुषांच्या पुतळ्याच्या आवारात कचरा करू नये. नागरिक कचरा करताना आढळल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.



पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या आठव्या स्मृती दिनानिमित्त नगर येथील पालकमंत्री जनसंपर्क कार्यालयात आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी भाजपा जिल्हा अध्यक्ष ॲड. अभय आगरकर,जिल्हा सरचिटणीस सचिन पारखी, प्रमोद रहाणे, प्रमुख ऐतिहासिक वस्तू संग्रहालय डॉ. संतोष यादव, अनिल तांदळे, अक्षय फलके, संतोष डांगळे आदी उपस्थित होते.

## भारतीय जनता पक्षाच्या सदस्य नोंदणीची अहिल्यानगरमध्ये ३१ डिसेंबरला कार्यशाळा

नगर – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा सदस्य नोंदणी अभियान २०२४ अंतर्गत आ. विक्रम पाचपुते यांच्या प्रमुख उपस्थितीत अहिल्यानगर महानगराची कार्यशाळा ३१ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता बहुउद्देशीय सभागृह पेमराज सारडा महाविद्यालय येथे आयोजित करण्यात आली आहे.

सर्व कार्यकर्ते पदाधिकारी यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन शहर जिल्हा अध्यक्ष अभय आगरकर यांनी केले आहे.

कार्यशाळा प्रमुख अशोक गायकवाड, नोंदणी प्रमुख प्रशांत मुथ्था हे आहेत.

३१ डिसेंबर वेळ:-सकाळी ११ वाजता. ठिकाण:- बहुउद्देशीय सभागृह पेमराज सारडा महाविद्यालय.

# सरपंचाच्या मुलावर कोयत्याने खुनी हल्ला करत जीवे मारण्याचा प्रयत्न

### तंटामुक्ती अध्यक्षाच्या घरावर दगडफेक करत कुटुंबियांनाही मारहाण, ७ जणांवर गुन्हा दाखल

नगर – मागील आठवड्यात गावातील रेशन दुकानात झालेल्या चोरी प्रकरणी पोलिसांना नावे सांगितल्याच्या संशयावरून ७ ते ८ जणांच्या टोळक्याने तंटामुक्ती अध्यक्षाच्या घरावर दगडफेक करत घरातील महिलांना मारहाण केली. त्यावेळी त्यांच्या मदतीला गेलेल्या सरपंचाच्या मुलावर कोयत्याने हल्ला करून त्यास जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची खळबळजनक घटना नगर तालुक्यातील खांडके गावात शुक्रवारी (दि.२७) रात्री घडली.

या हल्लयात सरपंच चंद्रकला चेमटे यांचा मुलगा किरण यमाजी चेमटे हे जखमी झाले असून त्यांनी जिल्हा रुग्णालयात उपचार घेत असताना दिलेल्या जबाबावरून नगर तालुका पोलिसांनी ७ जणांवर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला आहे. अनिकेत राजेंद्र ठोंबे (वय १९), निखील सुभाष ठोंबे, साहिल सुभाष ठोंबे, गणेश सुभाष ठोंबे, गौतम रामदास ठोंबे (सर्व रा. खांडके, ता.नगर) तसेच त्यांच्या सोबत पुण्याहून आलेला एक अनोळखी तरुण अशी आरोपींची नावे आहेत. यातील अनिकेत राजेंद्र ठोंबे व अन्य एक अशा दोघांना पोलिसांनी शनिवारी (दि.२८) अटक केली असून बाकीचे पसार झाले आहेत.

खांडके गावात मागील आठवड्यात रेशन दुकानात चोरी झाली होती. या प्रकरणी अज्ञात चोरट्यांवर गुन्हा ही दाखल झालेला आहे. या गुन्ह्यात सदर आरोपींचा सहभाग असल्याची माहिती तंटामुक्ती अध्यक्ष भगवान ठोंबे यांनी पोलिसांना दिली असल्याचा संशय या आरोपींना होता. या संशयावरूनच सर्व आरोपींनी शुक्रवारी रात्री ९ च्या सुमारास भगवान ठोंबे यांच्या घरावर दगडफेक केली. तसेच त्यांची आई व मुलींना मारहाण करू लागले. त्यातील एका मुलीने मदतीसाठी किरण चेमटे यांना फोन केला. ते तात्काळ तेथे गेले असता त्यावेळी आरोपींनी त्यांच्याकडे पाहत हरामखोरा तु सुद्धा मागील वेळेस सप्ताह चालू असताना आमच्यावर गुन्हे दाखल केले होते. आता जर तु भांडण सोडवायला आला तर तुलाही खतम करून टाकू अशी धमकी दिली.

त्यावेळी यातील चौघेजण किरण चेमटे यांच्या अंगावर धावून गेले व त्यांना पकडले. त्यावेळी आरोपी अनिकेत राजेंद्र ठोंबे म्हणाला तु सुद्धा काल भगवान ठोंबे बरोबर माझ्यावर गुन्हा दाखल करायला पोलीस स्टेशन मध्ये गेला होता. थांब आता तुला खलास करून टाकतो असे म्हणत किरण यांच्यावर कोयत्याने वार केला. तो त्यांनी हुकवण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्या डोक्याच्या उजव्या बाजूला लागला. तर एकाने डोक्यात लाकडी दांडके मारून जखमी केले. तसेच जाताना सर्व आरोपींनी यापुढे आमच्या नादी लागले तर बीडच्या मस्साजोग पेक्षा वाईट हालत करू अशी धमकी दिली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. फिर्यादीवरून पोलिसांनी ७ जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करत दोघांना अटक केली आहे. पुढील तपास सपोनि. प्रल्हाद गीते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे हे करीत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# केंद्र सरकारच्या कोविड काळातील अधिसुचनेच्या गैरवापराविरुध्द एआयओसीडीचा 'बंद'चा इशारा

नगर – कोविड-१९ महामारी दरम्यान घरपोच औषधं पुरवण्यासाठी दिलेली विशेष परवानगी, ज्याचा अवैध ऑनलाइन प्लॅटफॉर्मकडून गैरवापर होत आहे आणि जो सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण करत आहे, ती तात्काळ मागे घ्यावी, अशी मागणी एआयओसीडीने केंद्र सरकारकडे केली आहे.

ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट (एआयओसीडी) आणि महाराष्ट्र राज्य केमिस्ट्स ॲण्ड ड्रगिस्ट्स असोसिएशन, मिळून भारतातील एकूण १२.४० लाख औषध विक्रेते आणि वितरकांचे प्रतिनिधित्व करते, तिसऱ्यांदा आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या सचिवांना पत्र लिहून कोविड-१९ महामारी दरम्यान जारी केलेली जीएसआर २२० (ई) अधिसूचना रद्द करण्याची मागणी केली आहे.

मार्च २०२० मध्ये कोविड महामारी दरम्यान ही अधिसूचना जीएसआर २२० (ई) प्रसिद्ध करण्यात आली होती, ज्यामध्ये औषधनिर्मिती, विक्री व वितरण नियंत्रित करण्यासाठी औषध अधिनियमाच्या कलम २६बी अंतर्गत काही अटींसह वाहतुकीवर निर्बंध घालण्यात आले होते. या अधिसूचनेद्वारे घरपोच औषध पुरवण्यास परवानगी देण्यात आली होती आणि काही नियम, जसे की औषध विक्रीसाठी प्रिस्क्रिप्शनवर शिक्का मारणे (नियम ६५), यांना विशिष्ट परिस्थितीतून सूट देण्यात आली होती.

एआयओसीडीचे अध्यक्ष जे. एस. शिंदे आणि महासचिव राजीव सिंघल यांनी सांगितले की, या अधिसूचनेचा उद्देश स्थानिक औषध विक्रेत्यांमार्फत आपत्कालीन परिस्थितीत औषध डिलिव्हरी करणे होता. मात्र, आता स्विगी आणि इतर डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे आवश्यक नियामक उपायांचे पालन न करता घरपोच औषधे पुरवण्यासाठी याचा गैरवापर केला जात आहे. हे सर्व अवैध प्लॅटफॉर्म वैध प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधांची विक्री करत आहेत, ज्यामुळे स्व-चिकित्सा, नशेच्या औषधांचा गैरवापर आणि प्रतिजैविक प्रतिकारशक्ती (एएमआर) यांसारख्या गंभीर समस्या निर्माण होत आहेत.

अशा अवैध प्लॅटफॉर्मस फक्त त्यांच्या नफ्यावर लक्ष केंद्रित करत असून रुग्णांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करत आहेत. एआयओसीडी आणि राज्य संघटनेने म्हटले आहे की, या अधिसूचनेचा मूळ उद्देश परवानाधारक जवळच्या औषध विक्रेत्यांना विशिष्ट परिस्थितीत डिलिव्हरीसाठी परवानगी देणे हा होता ऑनलाइन प्लॅटफॉर्मद्वारे महत्त्वाच्या सुरक्षा उपायांकडे दुर्लक्ष करून नाही.

महामारीचा आपत्कालीन टप्पा संपुष्टात आला असून देशात आता सामान्य स्थिती परतली आहे. त्यामुळे ही अधिसूचना आता अप्रासंगिक आहे आणि तात्काळ रद्द करण्यात यावी.

औषध विक्री आणि वितरणासाठी प्रिस्क्रिप्शन आणि इतर सुरक्षा नियमांचे कायद्यातील तरतुदीनुसार कठोर पालन सुनिश्चित करावे.

देशातील औषधांची अवैध ऑनलाइन विक्री तात्काळ थांबवण्यात यावी, जेणेकरून औषधांच्या अनियमित विक्रीला आळा घालता येईल.

एआयओसीडी आणि दि महाराष्ट्र राज्य केमिस्ट्स ॲण्ड ड्रगिस्ट्स असोसिएशनला विश्वास आहे की जनतेच्या आरोग्य आणि सुरक्षिततेसाठी सरकारने सकारात्मक पावले उचलणे आवश्यक आहे. जर सरकारने यासाठी योग्य कार्यवाही केली नाही, तर एआयओसीडी आपल्या १२.४० लाख सदस्यांसह आंदोलन करायला बाध्य होईल.

## रेडी पझेशन गाळे विकणे आहेत
सारसनगर येथे मुख्य चौकातील नवीन बांधकामातील रेडी पझेशन गाळे विकणे आहे.
8275200054

## बंगला भाड्याने पाहिजे
गुलमोहररोड, एकवीरा चौक, पाईपलाईन, श्रीराम चौक या परिसरात २ बीएचके बंगला स्वतंत्र सर्व सोयींयुक्त पाहिजेत. (एजंट क्षमस्व)
8007835909
7498107977

## भाड्याने देणे
सावेडी येथे डौले हॉस्पिटलच्यामागे १ बीएचके आणि ४ रूमचा ब्लॉक भाड्याने देणे आहे. भरपूर जागा आणि पार्किंग सुविधा उपलब्ध आहे.
9822636766

## भाड्याने देणे
गजराजनगर, औरंगाबाद रोड येथील ५००० स्क्वे. फु. शेड, ३ रुम, सर्व सोयींयुक्त, गोडाऊनसाठी उपयुक्त भाड्याने देणे
9975454505

## बंगला भाड्याने देणे
गुलमोहोर रोड, कलानगर येथील सर्व सोयींयुक्त ३ बीएचके बंगला भाड्याने देणे आहे
9762857373

## १३०० स्क्वे.फूट गाळा भाड्याने देणे आहे
मार्केटयार्ड येथे सर्वसोयींनीयुक्त पहिल्या मजल्यावर १३०० स्क्वे. फूट गाळा, पतसंस्था, ऑफिसेस, दवाखाना,क्लाससाठी भाडेतत्वावर देणे आहे.
9890398098

## बंगला विकणे
मुकुंदनगर, नशेमन कॉलनी, १००० स्क्वे. फुट प्लॉट ६०० स्क्वे. फुट बांधकाम हॉल। किचन । बेड
* सर्व सोयींनी युक्त
* कर्ज सुविधा उपलब्ध
नविन वर्षाच्या सर्वांना शुभेच्छा..
सादात कंस्ट्रक्शन
9960939231

## गाळे भाड्याने देणे आहे
सिध्दीबागेजवळ ऑफिस, पतसंस्था, फायनान्स इतर व्यवसायासाठी गाळे सर्व सोयी-सुविधांयुक्त भाडेतत्वावर देणे आहे.
- संपर्क -
Mo. 9270570699

## अनलिमिटेड चिकन थाळी
नगरमध्ये पहिल्यांदाच कितीबी खा, अनलिमिटेड भरपेट चिकन थाळी !!
* चिकन सूप * चिकन भाजी
* अंडा मसाला * चपात्या
* स्टीम राईस * कांदा लिंबू
₹149/- संपर्क 9421782592 * चिकन लिमिटेड असेल
हॉटेल दामूअण्णा (ऑफर वेळ सायंकाळी ०६ ते रात्री ०९ असून,फॅमिली हॉटेल असल्याने अल्कोहोल, ड्रिंक घेण्यास सक्त मनाई आहे.)
(सोलापूर हायवेपासून पाच मिनिटाच्या अंतरावर) कानडेमळा, सारसनगर रोड,अ.नगर

## अनुभवी सेल्सगर्ल पाहिजे
शशिकला फॅशन शॉपी
8080197781

## पाहिजेत अकौंटंट
जागा १
(किमान ३ वर्षाचा अनुभव व GST चे ज्ञान आवश्यक)
सुपा, पारनेर, एम.आय.डी.सी., अहिल्यानगर
9075958448

## पाहिजेत
ऑफिस कामासाठी कायमस्वरुपी पदवीधर मुलगा पाहिजेत कॉमर्स असल्यास प्राधान्य
7972430745

## पाहिजेत
•कार्यालयीन स्टाफ
•मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह
अधिक माहितीसाठी संपर्क क्रमांक :
9699787086

## कार ड्रायव्हर कम वॉचमन जोडपे पाहिजे
श्रीराम चौक जवळ राहणाऱ्या (नवीन बंगल्यावर) शाकाहारी फॅमिली करिता कार ड्रायव्हर तसेच सर्व कामाकरिता सुशिक्षित जोडपे त्वरित पाहिजे. राहण्याची उत्तम सोय.
9373928971

## अकौंटट पाहिजे
Junior Accountant
(B.com) (Male)
Address: Savedi, Ahilyanagar
Contact details
Email ID:- sarangmilk9@gmail.com
आकर्षक पगार दिले जाईल.
Contact : 8975999272, 7030676870

## पाहिजेत
महिला कॉम्युटर ऑपरेटर - 4
मराठी-इंग्रजी टायपिंग
दुचाकी फिटर - 4
उत्तम पगार, अनुभव असल्यास प्राधान्य.
कवडेश्वर ॲटो वर्कशॉप
निंबळक बायपास चौक M.I.D.C., अ.नगर
* संपर्क *
9921159875 / 7840895880

## पाहिजे
इंडियन व महाराष्ट्रीयन जेवन बनवनारा शेफ पाहिजेत
हॉटेल नंदावर्त
३२, हनुमान नगर पाईप लाईन रोड अ.नगर मो. 9552592772

## Requirement

| Sr. No. | Requirement | Experience | Posts |
|---|---|---|---|
| 1. | Press Operator | Minimum 2 Years | 1 |
| 2. | Moulders | Minimum 1 Year | 2 |
| 3. | Buffer cum Belt grinder operator | Minimum 2 Years | 2 |
| 4. | Helpers | | 2 |

NAIKWADI INDUSTRIES
B-94, MIDC, Ahilyanagar-414111
Tel : 9325100657




क्रीडा महर्षी भावपूर्ण श्रध्दांजली!



स्व. सतिष प्रधान
शिवसेना नेते, मा.खासदार
शिवसेनेच्या जडण-घडणीमधील हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेबांचा एक सच्चा शिलेदार
स्व.दि.२९/१२/२०२४
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली!
: दुःखांकित :
नितीन थोरात मित्रमंडळ













